# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 5 | Marathi Monthly | Thane, Thursday , 1 November - 2023 to 30 November - 2023 | Pages 16 | Price : 10/-


# राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखालील 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चा,

## अतिशय प्रतिकूल परिस्थितीत औद्योगिकविश्वात आणखी एक मोठा चमत्कार...!!!




''देशी-विदेशी भांडवलदारांच्या नव्हे; तर, केवळ आणि केवळ कामगार-कर्मचारीवर्ग, रिक्षा-टॅक्सी चालक-मालक, शेतकरी-शेतमजूर यांच्या अल्पस्वल्प निधीवरच चालणाऱ्या शंभर टक्के प्रामाणिक, पारदर्शक व कमालीची जाज्वल्य... अशा 'धर्मराज्य पक्ष'प्रणित, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चा'', वॉलमेट (नेलेस) या बहुराष्ट्रीय कंपनीत ऐतिहासिक करार व कंपनीतील सर्व कंत्राटी-कामगारांना करार-कालावधित कराराअंतर्गत भरघोस पगारवाढीसह नोकरीत 'कायम' होण्याची देवदुर्लभ संधि...!!!

**डोंबिवली-अंबरनाथस्थित वॉलमेट (पूर्वीची नेलेस) या बहुराष्ट्रीय कंपनीच्या कामगारांना त्रैवार्षिक करारानव्ये १५ हजार रुपयांची थेट पगारवाढ (C.T.C. या फसव्या संकल्पनाधारित बनावट पगारवाढ नव्हे)...**

भारतीय उद्योगक्षेत्रात निर्माण झालेले असुरक्षिततेचे वातावरण, विषवल्लीप्रमाणे फोफावलेली कंत्राटीपद्धतीतील 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता'आणि नरेंद्र मोदी-अमित शहा यांच्या भाजपाई केंद्र सरकारने लादलेली ४ काळ्या कामगार-कायद्यांची...*(पान क्र. ५ वर)*

## अंबरनाथ-डोंबिवलीच्या बहुराष्ट्रीय 'वॉलमेट'पाठोपाठ, लागोपाठ पगार-बोनसवाढीच्या विक्रमी करारांची धडाकेबाज 'धर्मराज्य-मालिका' सुरुच...

### दिवाळसणाअगोदरच, विजयादशमीच्या पूर्वसंध्येला, दिवाळीच्या लवंगी-डांगी माळ फटाक्यांची दणदणीत आतषबाजी 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'कडून सुरुच...!!!

**नवी मुंबई-महापेस्थित 'टोटल एनर्जी', या बहुराष्ट्रीय कंपनीचं व्यवस्थापन आणि 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' यांच्यात पंचवार्षिक करार नुकताच संपन्न....**

नवी मुंबई-महापेस्थित 'टोटल एनर्जी' या बहुराष्ट्रीय कंपनीचं व्यवस्थापन आणि 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' यांच्यातील बोनस-पगारवाढ कराराची ठळक वैशिष्ट्ये....

पहिल्याच वर्षी रु.२० हजारांची घसघशीत थेट पगारवाढ (C.T.C. नव्हे) ...*(पान क्र. ५ वर)*

## सिंचन घोटाळ्यातल्या फाईल्स बंद करुन घेतल्यानंतर, आरोपपत्रातून (चार्जशीट) आपलं नाव गायब करुन घेतल्यानंतर...


# ''५% मुस्लिम आरक्षण'' एल्गाराचा, अजित पवारांचा 'फूल टू पॉवरफूल राजकीय गेम'...!!!

...*(पान क्र. २ वर)*



अंतरंग



त्या सद्गृहस्थाचे एकेक चाळे आणि कारनामे काळे...
...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. ५



महाराष्ट्रातील कामगार-कर्मचारीवर्गाचे 'खलनायक'
...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. ८



म्हणूनच, या जगाला आज, एखादा तरी 'गांधी', एखादा तरी 'बुद्ध' हवा..!!!
...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. ९

# ‘‘५% मुस्लिम आरक्षण’’ एल्गाराचा, अजित पवारांचा ‘फूल टू पॉवरफूल राजकीय गेम’...!!!

**सतत, आपला राजकीय स्वार्थ व सोयीनुसार बदलत्या राजकीय-भूमिका आणि गद्दारीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणातून झपाट्याने ‘बेदखल’ होऊ लागलेल्या अजितदादा पवारांनी, ‘‘आखरी रास्ता और डुबने से पहले एक तिनके का वास्ता’’ म्हणून, आपल्या मंत्रिमंडळातील दोन मुस्लिम मंत्र्यांसोबत (हसन मुश्रीफ व अब्दुल सत्तार) घेतलेल्या बैठकीत ‘‘५% मुस्लिम आरक्षणा’’चा एल्गार करुन सध्याच्या गद्दारीच्या, फोडाफोडीच्या महाराष्ट्रीय राजकारणात मोठा बॉम्बस्फोटच केलाय!**

अजितदादा, केवळ स्वभावाने फटकळच आहेत, असं नव्हे; तर, महाराष्ट्रातल्या राजकारणाची नस न् नस जाणणारे, हजारो कोटीत खेळणारे व ‘तेल लावलेल्या पहेलवाना’च्या तालमीत तयार झालेले अत्यंत बेभरवशी व धोकेबाज नेते आहेत. अशा नेत्याने ‘फडणवीस-शिंदे’ सरकारच्या, महाराष्ट्रभरातल्या जनतेला ‘फशी’ पाडू पहाण्याच्या, बनावट व ढोंगी ‘हिंदुत्वा’ला आरपार जाणलं नसेल, तर नवलच!

**‘हिंदुत्वा’चं कातडं पांघरलेल्या ‘लांडग्यांची लबाडी’, मुळातून अजितदादा नाही जाणणार (इथे गोपीचंद पडळकरांनी, अजितदादांबद्दल काय ‘फुत्कार’ टाकले, त्याचा कृपया संदर्भ घेऊ नये), तर मग कोण जाणणार?**



...आणि म्हणूनच, या बेगडी-बनावट-बोगस ‘हिंदुत्वा’चा, भाजपा-मिंधे सरकारचा असलेला ‘यूपीएस’च (UPS) उध्वस्त करण्याचा अजितदादांनी चंग बांधलेला दिसतोय. ज्या कमकुवत आधारावर हे ‘ई.डी.’ (E.D.) सरकार जेमतेम उभं आहे... तो आधारचं, ‘ब्लॅकमेलिंग’च्या भाजपाई राजकारणाचा प्रतिशोध म्हणून, अजितदादा समूळ नष्ट करण्यासाठी; तसेच, जाता जाता... आपलं डळमळीत झालेलं राजकीय-बस्तान, ठाकठीक करण्यासाठी (म्हणजे, ‘घरवापसी’चे संकेत) ‘‘५% मुस्लिम आरक्षणा’’चा ॲटमबॉम्ब, मंत्रालयाच्या रिंगणात फेकून मोकळे झालेत.

**‘‘राजकारणात कुठलाही ‘विधिनिषेध’ न बाळगणाऱ्या व व्यक्तिगत पातळीवर नितीमत्ताशून्य असलेल्या ‘पॉवर-सेंट्रिक पवारां’ना राजकारणातून एकवेळ संपवता येईल... पण, ‘मॅनेज’ करता येणार नाही’’, याचा कटू अनुभव इंदिरा गांधींपासून राजीव गांधींपर्यंत सगळ्यांनी अत्यंत वाईट पद्धतीने घेतला आणि आजवर काँग्रेसने केलेली ती तशी घोडचूकच ‘मोदी-शहा-फडणवीसांची बीजेपी’ करुन बसलीय. त्यामुळे, शिवसेना व राष्ट्रवादी संपवली म्हणून ‘जितम् मया, जितम् मया’ म्हणून थिरकणाऱ्या ‘फसणवीसां’च्या चिल्ल्यापिल्ल्या भाजपावाल्यांच्या पायाखालची जमीनच सरकलीय... अजितदादा नावाचं हाडूक गळ्यात अडकलेली बीजेपी, आता यापुढे ना ते धड गिळू शकणार, ना ते सहजी बाहेर काढू शकणार, एवढं मात्र खरं... धन्यवाद!**

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# २६ सप्टेंबर-२०२३ च्या ‘सकाळ’च्या अंकात छापलेलं, हेन्री फोर्ड यांचं भाष्य, एवढं ‘स्वयंस्पष्ट’ आहे की, ‘‘हातच्या कंकणाला आरसा कशाला’’?



**बँकिंग यंत्रणेविषयी लोकांना सगळी माहिती नाही, हे एका अर्थाने बरेच आहे; ती त्यांना मिळाली तर देशातील लोक उठावच करतील.**

**- हेन्री फोर्ड, उद्योगपती**

**सध्या आहे त्या अवस्थेतल्या लुटारु-शोषक ‘भांडवली-व्यवस्थे’तली ‘बँकिंग-व्यवस्था, जनसामान्यांना खरंच आकळायला लागली (जे फार काही अवघड मुळीच नव्हे) तर, रिझर्व्ह बँकेसह सर्वच बँकांची पद्धतशीर लूट कशी सुरु आहे, ते जनतेला हळूहळू ध्यानात येईल. रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन किंवा ऊर्जित पटेल, ती लूट करु देत नव्हते... म्हणून, पं. नरेंद्र मोदींनी त्यांना नाहक बदनाम करताना, ‘‘रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीवर वेटोळं घालून बसलेले नाग’’, अशी संभावना केली होती.**

बँकिंग-व्यवस्था, जनताला आकळू लागली की, १० लाख कोटी रुपयांची आपल्या बड्या गुजराथी-भांडवलदार मित्रांची (निवडणुकीसाठी शेकडो-हजारो कोटींच्या छुप्या व उघड देणग्या देणारे) कर्जे, नरेंद्र मोदी-अमित शहा सरकारने कशी माफ केली, ते तिला कळेल आणि शेतकऱ्यांची कर्ज माफ करताना किंवा कामगार-कर्मचारीवर्गाला चांगलचुंगलं ‘किमान-वेतन’ देताना; तसेच, रोहयो (रोजगार हमी योजना), अन्नसुरक्षा व आरोग्य-शिक्षण सेवेसारख्या लोककल्याणकारी योजनांवर खर्च करताना हे निर्दय, हुकूमशाही भाजपाई-सरकार हात पूर्ण आखडता का घेतं, हे सहजी आकळेल... एवढंच नव्हे तर, ८ नोव्हेंबर-२०१६ रोजी अचानक केलेली ‘नोटबंदी’, हा शतकातला सर्वात मोठा घोटाळा कसा होता, हे ही जनतेला समजून येईल.

...पण, त्यानंतर जे काही होईल, ते क्रांतिपेक्षा कमी नसेल; ज्यात, रक्तपिपासू-शोषक भांडवलशाही-व्यवस्थेचं बुजगावणं, लोकक्षोभात जळून भस्म होईल... देशात, ‘कार्ल मार्क्स’प्रणित साम्यवादी-समाजवादी स्थायी-व्यवस्था निर्माण होऊन (जो, सध्या जगभरातला जनमताचा मोठा क्रांतिकारी असा ‘डावीकडे कल’ आहे) सर्वसामान्य जनता, भांडवलदारांच्या जोखडातून कायमची मुक्त होऊन मोकळा श्वास घेऊ शकेल!

...एक असा समाज निर्माण होईल ज्यात, टोकाची व अमानुष स्वरुपाची आर्थिक-विषमता कधिही नसेल. कोणीही अदानी-अंबानी किंवा अमेरिकेन मेझॉनच्या ‘जेफ बेझोस’सारखा विकृत अतिश्रीमंत (Blood-Billionaire) नसेल; जनतेतला फक्त, अल्पसंख्यांकवर्ग आर्थिकदृष्ट्या संपन्न होण्याऐवजी, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरु व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली ‘आर्थिक-समानता’ बऱ्यापैकी येईल आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, ‘‘भांडवली-व्यवस्थेतल्या चंगळवादी जीवनशैली व कार्बनकेंद्री आर्थिक-प्रारुपामुळे होणारं कार्बन-उत्सर्जन झपाट्याने घटून निसर्ग-पर्यावरणीय महासंकटातून मानवजातीसह अवघी सजीवसृष्टी उध्वस्त होण्याचा धोका टळू शकेल!’’

***...राजन राजे***

***(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# कंत्राटीकामगारांची पिळवणूक आणि 'अग्निविरां'ची शोकांतिका!!!

**कालपरवापर्यंत, देशामधील अनेक कंपन्या-कारखान्यांमध्ये, विशेषतः, महाराष्ट्रातील रासायनिक उद्योगांमध्ये, औद्योगिक-अपघातांची मालिका सुरुच आहे. यावर ताण म्हणजे, 'आऊटसोर्सिंग'च्या शोषणकारी नव-भांडवली तंत्रातून बनलेल्या छोट्यामोठ्या वर्कशॉप्समधील तर, सातत्याने होणाऱ्या शेकडो-हजारो अपघातांची ना कुठली नोंद, ना मरणाऱ्या किंवा जखमी होणाऱ्या 'कामगार' नावाच्या आधुनिक 'गुलामां'ची कुणाला पर्वा!**

...औद्योगिक-सुरक्षिततेचे अतिशय खर्चिक व काटेकोर नियम पाळण्यात अमानुष हेळसांड संबंधितांकडून होत असल्यानेच, ती मानवनिर्मित अपघातांची मालिका यासाठी थांबायला तयार नाही कारण, मरणारे सगळेच 'कंत्राटी-कामगार' असतात, ज्यांना नसतं कुठलं कायदेशीर संरक्षण, ना कुठल्या युनियनचं भक्कम पाठबळ आणि आपल्या देशातलं कामगारखातं, म्हणजे सगळा आनंदीआनंदच असतो.

त्यामुळेच, कंत्राटी-कामगाराचं (खरं म्हणजे, 'गुलामां'चं) अपघाती मरण, ही भांडवलदारवर्गासाठी अगदी स्वस्तात व कुठलीही बोंबाबोंब न होता... कुठली कायदेशीर सजा तर सोडाच; साधा त्रासही न होता, चटावरच्या श्राद्धासारखी अतिशय स्वस्तात उरकण्याची बाब होय! पोलिसांसह संबंधित सरकारी अधिकाऱ्यांचे हात ओले केले की, झालं.

...म्हणूनच, कारखान्यांमधील औद्योगिक अपघातांची, आताशी मालकांना किंवा व्यवस्थापकीयवर्गाला फारशी भयभिती उरलेली नाही... कारण, पुन्हा ते आणि तेच की, ''मरणारे कंत्राटी-कामगार म्हणजेच, आधुनिक भांडवली-व्यवस्थेतले 'गुलाम' असतात''.

**भांडवलदारवर्गाचं देणं घेणं फक्त, कंपनीच्या नफ्याशी आणि आपलं वैयक्तिक 'करियर' टिकवण्याशी-वाढवण्याशी असतं. भांडवलदारवर्गाला माणुसकीचा लवलेश असण्याचा तसा प्रश्नच फारसा नसतो... त्यांच्यासाठी, जी कच्च्या मालाची किंमत किंवा यंत्रसामुग्रीची जेवढी 'पत', तेवढीच कामगाराची किंमत किंवा पत...जशी, कच्चा माल किंवा यंत्रसामुग्रीची फक्त, 'किंमतीची बोली' लावण्यापुरतीच पत्रास ठेवायची असते; तशीच, किंवा त्याहीपेक्षा कमी फिकीर कामगार, या मानवी-घटकाची करायची असते, एवढंच.**

कामगार, हा एक जिवंत हाडामांसाचा, राष्ट्रीय-संपत्तीचा 'निर्माता' असलेला अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे वगैरे, त्यांच्या गावीही नसतं. त्याची टोकाची पिळवणूक करुन बोनस-पगारावरचा, त्याच्या औद्योगिक-सुरक्षिततेवरचा किंवा वैयक्तिक सुरक्षिततेवरचा; तसेच, कंपनीत अपघातात दगावल्यास कंपनीतर्फे द्याव्या लागणाऱ्या नुकसानभरपाईवरचा आणि त्याचा व त्याच्या कुटुंबियांच्या अपघाती-आरोग्य विम्यावरचा खर्च इ. इ. त्याच्यावरचा जेवढा जेवढा म्हणून खर्च कमी करता येईल... तेवढा तो कमीतकमी राखून, नफ्याचे आकडे व व्यवस्थापकीयवर्गाचे पगारभत्त्याचे आकडे भरमसाठ फुगवता कसे येतील, याकडेच केवळ भांडवलदारवर्गाचं संपूर्ण लक्ष केंद्रित झालेलं असतं... मग ही अपघातांची मालिका थांबूच कशी शकेल, कोण थांबवणार???

**धक्कादायकरित्या, आता हेच अत्यंत उद्वेगजनक व संतापजनक लोण, लष्करातील नवतरुण 'अग्निवीरां'पर्यंत पोहोचलंय ('धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन 'अग्निवीर-प्रथा' ही 'कंत्राटी-कामगारपद्धती'तल्या गुलामगिरीचीच 'पिलावळ' आहे, ही आम्ही सतत गर्जून मांडणी करत होतोच, त्याचा या दुर्दैवी घटनेच्या निमित्ताने प्रत्यय यावा)...पण, आपल्या देशात ही भयानक बातमी अंबानी-अदानीच्या 'गोदी-मिडीया'तून संपूर्ण दाबली गेल्यामुळे, भारतीय जनतेपर्यंत ती पोहोचूच शकलेली नाही आणि एका अग्निवीराचं हौतात्म्य कवडीमोल भावात किंवा बाराच्या भावात निकाली काढलं गेलं... आणि तिकडे 'धार्मिक अथवा उत्सवी अफू'सेवनाची चटक लागलेली भारतीय जनता आपल्या सवयीनुसार कुठल्या न् कुठल्या औटघटकेच्या करमणुकीच्या नादात नेहमीप्रमाणेच आहे... या खेपेस तर, भारत-पाकिस्तान क्रिकेट-सामन्याचा 'शिमगा' होता, मग काय विचारता?**

...तर, घडलं असं की, गेल्या बुधवारी एका भारतीय सैनिकाला जम्मू-काश्मीरच्या नियंत्रणरेषेवर हौतात्म्य प्राप्त झालं... त्याचं नाव अम्रितपालसिंग व नंबर A2200058N, युनिट क्र.१०JAK रायफल्स, रँक-अग्निवीर, वय वर्ष १९ फक्त आणि पुढे जो काही धक्कादायक घटनाक्रम घडला, तो धुरंधर व जातिवंत पत्रकार पुण्यप्रसून बाजपेयींच्या जळजळीत शब्दांत ऐका आणि कथित 'भाजपाई-राष्ट्रवादा'ची रांगोळी, येऊ घातलेल्या दिवाळीत कुठल्या रंगात, त्या सैनिकाच्या गावपरिसरात काढली जाईल, त्याची फक्त, मनोमन कल्पना करा...!!!

***...राजन राजे***

***(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

## ऑपरेशन राहुल गांधी, मग संजयसिंग आणि आता, महुआ मोईत्रा...गौतम अदानीला वाचविण्यासाठी, केविलवाणी भाजपाई कसरत!

**दुबेंच्या 'सुपारीबाज' निशिकांतचा जो 'आकांत', आजवर चालत आलेला आहे... तो कधि राहुल गांधींच्या विरोधात, कधि 'आप'च्या जिगरी संजयसिंगांच्या (सध्या टार्गेट, महुआ मोईत्रा) विरोधात, तर कधि मोदी-शाह राजवटीतल्या तमाम गैरप्रकारांवर लिहिणाऱ्या पत्रकारांविरुद्ध... असा, कायमच 'सुपारी' घेतल्यासारखा चालू असतो. तेच, त्या निशिकांत दुबेंचं एकमेव कर्तृत्त्व (ज्यातून, लोकसभा-निवडणुकीतील तिकीट पक्कं करण्याचा त्यांचा नापाक इरादा आहे).**

एकूणच विरोधकांच्या वैयक्तिक-जीवनाधारित 'ब्लॅकमेलिंग'ची सगळी नौटंकी, हा सगळा निशिकांत दुबेकृत थयथयाट... अत्यंत घृणास्पद अशा आयटी-सेलवाल्या 'भाजपाई-संस्कृती'ला (विशेषतः 'गुजराथी-लॉबी'च्या संस्कृतीला) धरुनच आहे... आठवा, संघाच्याच 'संजय जोशीं'चं आणि पाटीदार-आरक्षण आंदोलनातल्या हार्दिक पटेलचं सीडी-प्रकरण (त्यातल्या, संजय जोशींच्या सीडी तर, चक्क बनावट असल्याचं पुढे सिद्ध झालं होतं). दिल्लीतील महिला-पहेलवानांचं आंदोलन ते महुआ मोईत्रा; व्हाया, मणिपूर आदिवासी महिलांवरील अत्याचार... अशी, 'महिला-सक्षमीकरणा'ची भाजपाची बेगडी-बनावट भूमिका भारतीय जनतेसमोर एव्हाना पूर्णपणे उघडी पडलेली आहे. उद्या भाजपातील कुणी स्मृती इराणी, मीनाक्षी लेखी, नवनीत राणा, कंगना राणावत यांपैकी कोणी महिला-नेतेमंडळी 'बगावत' करतील.... तर, भाजपा आयटी-सेलवाले, त्यांनाही त्यांच्या खाजगी-जीवनावरुन 'ब्लॅकमेल' करायला कमी करणार नाहीत... एवढ्या खालच्या थराला भाजपाई-नितीमत्ता गेलेली आहे.

**आम्हाला महुआ मोईत्रा, खाजगी जीवनात काय करतेय (जोपर्यंत त्या खाजगी-जीवनाचा, तिच्या सार्वजनिक जीवनावर वाईट परिणाम होत नाही), याच्याशी काहीही देणंघेणं नाही... एवढंच काय, अदानीच्या संदर्भात ती कुठल्या परिस्थितीत किंवा कुणाच्या पाठबळावर प्रश्न विचारतेय, यांच्याशीही आम्हाला बिलकूल देणंघेणं नाही. मुख्य मुद्दा, तिने विचारलेल्या प्रश्नांवर आणि केलेल्या आरोपांवर... निःपक्षपाती सखोल चौकशी होणार का आणि त्याचे निष्कर्ष जनतेला पारदर्शकपणे कळणार का व महुआ मोईत्रांचे आरोप सत्य असतील; तर, त्यासंदर्भात अदानीवर कायदेशीर कारवाई होणार का? एवढाच भारतीय जनतेपुरता मर्यादित आहे.**

त्यामुळेच, ''माझी चौकशी होण्याआधी गौतम अदानीची चौकशी ईडी/सीबीआय/आयटीने करावी, एवढंच म्हणून थांबू नका, महुआ मोईत्राजी... अदानीच्या खास आतल्या वर्तुळातल्या तमाम 'लाभार्थी' राजकीय नेत्यांचीही सखोल चौकशी करावी'', अशीही मागणी करा!

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# अतिशय प्रतिकूल परिस्थितीत औद्योगिकविश्वात आणखी एक मोठा चमत्कार...!!!

...(पान क्र. १ वरुन)

'काळी कामगार-संहिता' (Black Labour-Code), अशा पराकोटीच्या दडपशाहीच्या रेट्यात, देशातील कामगार-चळवळ जवळपास 'मृतप्राय' झालेली असतानाच, 'धर्मराज्य पक्ष'प्रणित, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष आणि ज्येष्ठ कामगारनेते, राजन राजे यांनी मात्र, आपली चार दशकांच्या दैदिप्यमान पगारवाढीच्या करारांची आपली 'धर्मराज्य-परंपरा' कायम ठेवली असून, ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली एमआयडीसी व अंबरनाथ एमआयडीसी या दोन्ही ठिकाणी कार्यरत असलेल्या, 'नेलेस-वालमेट इंडिया प्रा.लि.' या आस्थापनेतील कामगारांसाठी १५ हजार रुपयांची थेट पगारवाढ त्रैवार्षिक-करारान्वये करण्यात आलेली आहे.

**शुक्रवार, दि. ६ ऑक्टोबर-२०२३ रोजी, अंबरनाथ एमआयडीसीमधील आस्थापनेत हा ऐतिहासिक त्रैवार्षिक-करारवाढीचा करार मोठ्या जल्लोषात आणि हर्षोल्हासाच्या वातावरणात संपन्न झाला.**

**या त्रैवार्षिक करारामुळे, प्रामुख्याने भूमिपुत्र असलेल्या कामगारांच्या आयुष्यात धर्मराज्य-संघटनेचा कोंबडा खणखणीत स्वरात आरवल्यामुळे, आर्थिक समृद्धीची पहाट झालेली आहे. त्यामुळेच, ''केवळ एका पिढीचंच नव्हे; तर, कामगारांच्या तमाम पुढील पिढ्यापिढ्यांचंही कल्याण साधणारा नेता'', या राजन राजे यांच्या क्रांतिकारी लौकिकावर पुरश्च नव्याने शिक्कामोर्तब झालेलं आहे!**

**'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सभासद झाल्यानंतरचा, वॉलमेट (नेलेस) कंपनी-कामगारांचा हा पहिलावहिला करार होय...**

**या ऐतिहासिक करारामुळे, आजवर वेतनमान-बोनस (पूर्वीचे कमीतकमी वेतन रु.१८ हजार, जास्तीतजास्त रु.४४ हजार व सरासरी रु.२२ हजार) व विविध सेवाशर्तीबाबत पिछाडीवर पडलेल्या वॉलमेट (नेलेस) कामगारांचे या करारामुळे वेतनमान कमीतकमी रु.३३ हजार ते जास्तीतजास्त रु.६० हजार इतके झाले असून, सरासरी वेतनमान ३७ हजार इतके झाले आहे...**

**पगारवाढीतील ६०% रक्कम PF-Base मध्ये (मूळ पगार + महागाई भत्त्यात) समाविष्ट तर, ४०% रक्कम इतर भत्त्यांमध्ये....**

**कराराच्या पहिल्या वर्षीच, एकूण रु.१५ हजारांपैकी ४०% रक्कम व उर्वरित दोन वर्षांमध्ये प्रत्येकी ३०% रक्कम...**

**त्याचबरोबर, दिवाळी बोनस म्हणून ३२ हजार रुपयांची रक्कम कामगारांना मिळणार आहे. यामुळे दिवाळीच्या एक महिना आधीच, कामगारांचा दिवाळसण साजरा झाला आहे.**

**करारान्वये दिवाळी भेटवस्तू रकमेत; मरणोत्तर नुकसानभरपाई तसेच, विम्याच्या रकमेसारख्या सेवासुविधांमध्ये घसघशीत वाढ...**

एकूण वार्षिक रजांमध्ये तब्बल ९ दिवसांची वाढ...

सर्वात, महत्त्वाची बाब म्हणजे, संपूर्ण देशभरातील कामगारांना देशोधडीला लावणारे कंत्राटी-कामगार पद्धतीची विषारी-विखारी पिल्लावळ देशभर पसरलेली असतानाच, नेलेस-वालमेट कंपनीतील, एकूण २५ कंत्राटी कामगारांना, कराराच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने कायम केले जाणार असून, या कंत्राटी कामगारांनादेखील करारांतर्गत तब्बल ८ हजार रुपयांची भरघोस पगारवाढ देण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्रातील पुणे, चिंचवड, नाशिक, नागपूर पासून ते इथल्या नवी मुंबई, रायगडमधील असंख्य कंपन्यांमधील कामगारांना 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ची युनियन आणण्याची मनोमन तीव्र इच्छा आहे... पण, या कंपन्यांमधील 'युनियन-कमिटी' नावाचे आधुनिक 'शुक्राचार्य' आपल्या निहीत स्वार्थासाठी 'धर्मराज्य'ची युनियन कंपनीत येऊ देण्याच्या मार्गात खोडा घालतात व कंपनीची समृद्धी वरुन खाली झिरपत कामगार-कर्मचारीवर्गापर्यंत पोहोचूच देत नाहीत. परिणामी, आजच्या घटकेला महाराष्ट्रभरातील लाखो कामगार चांगलंचुंगलं वेतनमान-बोनस व सेवासुविधा-सुरक्षितता यापासून वंचित आहेत; तसेच, या आधुनिक-शुक्राचार्यांमुळेच कंपन्या-कंपन्यांमधून कंत्राटी-कामगार पद्धतीची 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता' भयंकर फोफावलेली आहे. पण, वॉलमेटच्या जाणकार युनियन-कमिटीने उपजत शहाणपणाच्या बळावर योग्य निर्णय घेतला व तिथेच, तुमचं व कंपनीचं उज्ज्वल भविष्य सुनिश्चित झालं!**



**''एका कायम कामगाराच्या जागी, तीन कंत्राटी-कामगार नेमण्याचे'' कामगारघातकी 'ट्रिपल-इंजिन' सरकारचे धोरण असताना व संपूर्ण भारतात कामगारविरोधी धोरणांचे चक्रीवादळ गरगरत असतानाच, प्रवाहाच्या विरोधात पोहून जाण्याची किमया... पोलादी कामगार-एकजुटीच्या बळावर, राजन राजे आणि त्यांच्या अध्यक्षतेखालील 'धर्मराज्य पक्ष' व त्याअंतर्गत असलेल्या 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ने नावाच्या कामगार संघटनेने, करुन दाखवलेली आहे. काळी कामगार संहिता लादून, कायम-कुशल कामगारांना अक्षरशः 'गुलाम' बनविण्याचे विश्वासघातकी-घृणास्पद उद्योग सुरु असताना, राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली संपन्न झालेला हा ऐतिहासिक करार म्हणजे, सध्याच्या घडीला औद्योगिकविश्वातील एक चमत्कारच गणला जाईल!**

डोंबिवली-एमआयडीसी येथील कंपनीत, व्यवस्थापनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाल्यानंतर, राजन राजे यांनी संपूर्ण कंपनीची पाहणी करुन, कामाचे स्वरुप जाणून घेतले. त्यानंतर, अंबरनाथ एमआयडीसी येथील कंपनीत जाऊन, त्या कंपनीचीही पाहणी केली. यावेळी दोन्ही आस्थापनांतील व्यवस्थापनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अंबरनाथ येथे कामगारांच्या ऐतिहासिक पगारवाढीचा करार संपन्न झाल्यानंतर, राजन राजे यांनी, दोन्ही कंपन्यांतील कामगार-सदस्यांना संबोधित केले.

...यावेळी कामगारांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, ''आजच्या मंगलप्रसंगी सर्वप्रथम, आपल्या वॉलमेट कंपनीच्या युनियन-कमिटीचं हार्दिक अभिनंदन व मनःपूत कौतुक... ते यासाठी, कारण त्यांनी धर्मराज्य-संघटनेची निवड करुन तुमच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग मोकळा केला. महाराष्ट्रातील पुणे, चिंचवड, नाशिक, नागपूरपासून ते इथल्या नवी मुंबई, रायगडमधील असंख्य कंपन्यांमधील कामगारांना 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ची युनियन आणण्याची मनोमन तीव्र इच्छा आहे... पण, या कंपन्यांमधील 'युनियन-कमिटी' नावाचे आधुनिक 'शुक्राचार्य' आपल्या निहीत स्वार्थासाठी 'धर्मराज्य'ची युनियन कंपनीत येऊ देण्याच्या मार्गात खोडा घालतात व कंपनीची समृद्धी वरुन खाली झिरपत कामगार-कर्मचारीवर्गापर्यंत पोहोचूच देत नाहीत. परिणामी, आजच्या घटकेला महाराष्ट्रभरातील लाखो कामगार चांगलंचुंगलं वेतनमान-बोनस व सेवासुविधा-सुरक्षितता यापासून वंचित आहेत; तसेच, या आधुनिक-शुक्राचार्यांमुळेच कंपन्या-कंपन्यांमधून कंत्राटी-कामगार पद्धतीची 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता' भयंकर फोफावलेली आहे. पण, वॉलमेटच्या जाणकार युनियन-कमिटीने उपजत शहाणपणाच्या बळावर योग्य निर्णय घेतला व तिथेच, तुमचं व कंपनीचं उज्ज्वल भविष्य सुनिश्चित झालं! **गेल्या दिडेक वर्षांच्या, स्थानिक युनियन-कमिटीसह धर्मराज्य-संघटनेच्या महेशसिंग ठाकूर (महासचिव) आणि रमाकांत नेवरेकर (उपाध्यक्ष) यांच्या अथक मेहनतीलाही दाद द्यायलाच हवी. मात्र, अशा मंगलमय प्रसंगी आजुबाजुच्या बदलत्या परिस्थितीचं, आपण व्यवस्थित भान बाळगणं अत्यावश्यक आहे... मित्रहो, तुमच्यासारख्या तरुण कामगारांनी, फाजील उत्सवप्रियता सोडून दिल्याशिवाय आणि बहुजनहिताची 'कामगारहितदक्ष डावी (साम्यवादी किंवा कम्युनिस्ट) राजकीय-जागृती तुम्ही तुमच्यात निर्माण केल्याशिवाय, तुमची आर्थिक प्रगती व नोकरीत सुरक्षितता निर्माण होऊ शकणार नाही व एकदा निर्माण झालेली टिकू शकणार नाही.** आज महाराष्ट्रात कंत्राटी-कामगार पद्धतीच्या अवदसेनं धुमाकूळ घालून अवघं कामगारविश्व उध्वस्त केलेलं असताना... बेरोजगारी, अर्धरोजगारीचं थैमान सुरु असताना व 'कंपनी-दहशतवादा'मुळे (Corporate-Terrorism) कामगारांचं जगणं टोकाचं 'असुरक्षित' झालेलं असताना, सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, सत्यनारायणाच्या महापूजा, दहीहंड्या यांचा नुसता महापूर आलाय आणि त्यातच अवघी मराठी तरुणाई अडकून पडल्याचं अत्यंत दुर्दैवी चित्र आहे. ...(पान क्र. ५ वर)

## ...लागोपाठ पगार-बोनसवाढीच्या विक्रमी करारांची धडाकेबाज 'धर्मराज्य-मालिका' सुरुच...... *(पान क्र. १ वरुन)*

त्यानंतर, पुढील प्रत्येक वर्षी वाढीव पगारवाढीवर, १०% अधिकची चक्रवाढीच्या तत्त्वाने वाढ चालू.... अशातऱ्हेनं, कराराच्या अखेरीस एकूण पगारवाढ रु.२९,२००/- (रु. एकोणतीस हजार दोनशे)

करारान्वये, कमीतकमी पगार रु.७४,२८२/- तर, जास्तीतजास्त पगार रु.८४,२८२/-...

बोनस रक्कम पहिल्या वर्षी रु. १,१०,००० (रु.एक लाख दहा हजार) आणि त्यात प्रतिवर्षी रु.१०,००० (रु. दहा हजार) अतिरिक्त वाढ, 'सहा आकडी' बोनसमध्ये पुढे चालूच...

आरोग्यविमा (मेडिक्लेम) हमी रकमेत ३ लाखांवरुन ५ लाखापर्यंत घसघशीत वाढ...

मात्र, कामगारांमध्ये फुटीर गटाचंही (जो कामगार-चळवळीला साफ बरबाद करणारा 'कोंबडी-रोग' हल्ली सर्रास पसरलाय) लक्षणीय प्राबल्य असल्याने 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता'स्वरुप असलेल्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'चं निर्मूलन करण्यात, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ला यश दुर्दैवाने लाभलेलं नाही... हे ही येथे प्रांजळपणे नमूद केले पाहीजे.

प्रसंगी, पगारवाढ थोडी कमी झाली तरी, चालेल... पण, कामगारविश्वाला गुलामगिरीच्या अंधःकारात ढकलून देणाऱ्या, कंत्राटी-कामगार पद्धत', आऊटसोर्सिंग, NEEM वगैरेंच्या महाअवदसेला धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाच्या कुठल्याही करारातून निकराच्या ताकदीनं आव्हान देण्याचं 'ब्रीद', 'धर्मराज्य'ने अवलंबलेलं असूनही, जेव्हा क्षुद्र-स्वार्थी बुद्धी




व वृत्तीचे कामगारच जेव्हा, उर्वरित कामगार-कर्मचारीवर्गाचे 'शत्रू' बनतात तेव्हा, सद्यस्थितीत असे महाकर्मकठीण (राजकीय पाठबळ नसल्यानेच) संकल्प राबवणे, अशक्यप्राय बनतं!

कामगारविश्वात क्रांति घडवून 'कंपन्यांची पगार-बोनस संदर्भात असणारी, तोपर्यंत कामगारनेत्यांना 'मॅनेज' करुन दडवून ठेवलेली मोठी 'देय-क्षमता' (Paying Capacity) आपल्या लढाऊ-आक्रमक बाण्याने संपूर्ण भारताला दाखवून देणाऱ्या डॉ. सामंत, या लढाऊ-जाज्वल्य कामगार-नेत्याच्या कार्यकाळात, त्यांच्या जबरदस्त दणक्याने बहुराष्ट्रीय कंपन्या, या 'उत्तम पगार-बोनस दात्या' होताना मोठ्याप्रमाणावर दिसत होत्या... तेव्हा, कामगार-कर्मचारीवर्गाची त्यासाठी लढ्याची वज्रमूठ कामगार-एकजुटीतून बांधलीजात होती... मात्र, अलिकडे कामगार-कर्मचारीवर्गामधली गद्दारी, क्षुद्र कारणांसाठी फाटाफूट करण्याची घातकी वृत्ती, कामगारवर्गाची स्खलनशीलता (दारु-जुगाराची व्यसनाधीनता, बेशिस्त, फाजिल-सणउत्सवप्रियता, अविचाराने उधळमाधळ करण्याची अनिष्ट प्रवृत्ती), कामगार-नेतृत्त्व करण्याची मुळातून यःकिंचितही लायकी नसताना, तथाकथित नेतेगिरीतल्या मोठेपणाचा 'सैतानी हव्यास'(म्हणजे, कामगारहिताची 'नौका' वल्हवता येत नसल्याने बुडणार असेल तर खुशाल बुडू देत; पण, बुडताना तरी मला 'कामगार नेता' म्हणवून घ्यायचंय, हाच तो 'सैतानी-हव्यास') इ. कामगार-चळवळीसाठी अवसानघातकी ठरणाऱ्या प्रवृत्तींमुळे आज भारतभर बहुराष्ट्रीय-कंपन्यांची व्यवस्थापनं, 'कंपनी-दहशतवादा'चा घृणास्पद अवलंब करीत कामगार-कर्मचारीवर्गाचं शोषण करताना व त्यांच्यावर अन्याय-अत्याचाराचा कहर करताना दिसतायतं... यात, कामगार-कर्मचारीवर्गाचा मोठा दोष वरीलप्रमाणे आहेच, हे दाहक वास्तव, कोण नाकारु शकेल...???

कराराप्रसंगी, कंपनी-व्यवस्थापनाच्या वतीने, व्हाईस प्रेसिडेंट श्री. राजू कदम, व्हॉईस प्रेसिडेंट-HR सौ. सुकृती कौल, पर्सनल मॅनेजर-IR श्री. लोकेशकुमार वारुळे, ऑपरेशनल मॅनेजर श्री. निलेश जाधव, कंपनीचे कामगारविषयक सल्लागार व ख्यातनाम 'मुल्ला अँड मुल्ला' आस्थापनेचे सर्वेसर्वा श्री. असिफ मुल्ला, श्री. सईद मुल्ला, श्री. अमित, तसेच 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर आणि युनिट कामगार प्रतिनिधी श्री. दिनेश सिंग, श्री. रॉबर्ट जतान्ना व श्री. प्रकाश शिंदे आदी मान्यवर, या आनंदोत्सवाप्रसंगी उपस्थित होते.

## अतिशय प्रतिकूल परिस्थितीत औद्योगिकविश्वात आणखी एक मोठा चमत्कार...!!! *...(पान क्र. ४ वरुन)*



जगभरातील बहुसंख्यांक कामगार, रक्तपिपासू-निर्मम-शोषक (Vampire-State System) भांडवलशाहीला विरोध करणाऱ्या साम्यवादी-समाजवादी डाव्या विचारसरणीच्या राजकीय पक्ष व नेत्यांकडे, त्यांच्या त्यांच्या देशातल्या राजकारणाची सूत्रे सोपवत असताना, आम्ही असे उदासीन का? जगभरात कामगार-चळवळ त्या त्या देशांमधील राजकारणाची दिशा ठरवत असताना... आपल्याकडील बहुसंख्यांक असलेल्या कामगार-कर्मचारीवर्गाला गल्लीतलं काळं कुत्रं देखील का विचारीत नाही, याचा गांभीर्याने विचार आत्ताच करायला हवा, नंतर ती वेळ आपल्या हातात शिल्लक रहाणार नाही. आजच्या घडीला देशातील कामगार-शेतकरीवर्ग, हाच प्रामुख्याने देशातील संपत्तीचा 'निर्माता' असतानादेखील...त्याला, देशातील साधनसंपत्ती व समृद्धीचा रास्त वाटा मिळू नये व त्याचीच भीषण परवड केली जावी, ही फारच अस्वस्थ करुन सोडणारी बाब आहे'', असं प्रतिपादन करुन राजन राजे पुढे म्हणाले की, ''ठाणे-रायगड-नवी मुंबई पुरतं बोलायचं झालं तर, या भागातल्या भूमिपूत्र आगरी-कोळी-कराडी; तसेच, मराठा-दलित-मुस्लिम समाजातील कामगार-कर्मचारीवर्गाला न्याय देणारं व सुखासमाधान व सुरक्षितता निर्माण करणारं, एकमात्र संघटन, हे 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' तर, कामगारविश्वात एकमात्र क्रांतिकारक नेता 'राजन राजे' आहे!''

**जेव्हा, बाहेरच्या औद्योगिक जगतात ''१२ तासांच्या कामाला १२ हजार पगार'', असं टोकाचं शोषण होत असताना... या 'धर्मराज्य-करारा'मुळे, आता तुमचा पगार ५० ते ६० हजारांच्या घरात जाईल व पुढे तुम्ही सारेच, नजिकच्या भविष्यात 'धर्मराज्य'च्या झेंड्याखाली वेतनमान व बोनसच्या संदर्भात 'सहा आकड्या'त खेळाल... पण, त्यामुळे अजिबात ऊतूमातू जाऊ नका. पुढचा काळ श्रमिकवर्गासाठी, तळागाळातल्या दीनदुबळ्यांसाठी अतिशय भीषण असणार आहे. तेव्हा, पैशांची बचत करुन, शेतजमीन खरेदीसारखी भविष्यवेधी योग्य गुंतवणूक करा, काटकसरीचं आर्थिक धोरण अवलंबवा. तसेच, सुदैवाने सध्याचं आपलं व्यवस्थापन अतिशय सकारात्मक व कामगारहितदक्ष असल्याने, त्यांना मनापासून सर्वच बाबतीत संपूर्ण सहकार्य करा व कंपनीच्या म्हणजेच, पर्यायाने तुमच्या भरभराटीला हातभार लावा. कामगार म्हणून आता तुमचीही जबाबदारी वाढलीय. कामाच्या बाबतीत व शिस्तीच्या बाबतीत, धर्मराज्य संघटना व व्यक्तिशः नेता म्हणून मी... कोणतीही हयगय कुठल्याही स्थितीत कधिच सहन करत नाही...** कोणतीही रास्त अडचण आली व ती कमिटी वा अन्य संघटना-नेत्यांकडून दूर होत नसेल... तर, अगदीच तशी गरज भासल्यास वेळप्रसंग पाहून थेट माझ्याशी संपर्क साधा. 'आळशी-उद्धट कामगार राष्ट्राला भार... मेहनती-नीतिमान कामगार राष्ट्राला आधार', हे आपले ब्रीदवाक्य कायमचं हृदयात कोरुन ठेवा. आज देशभरात कामगारविरोधी धोरण राबविले जातंय, चार काळ्या कामगार-कायद्यांची संहिता (Black Labour-Code) आपल्या भरल्या संसारावर वरवंटा फिरवण्यास सज्ज झालीय... तेव्हा, सतत सावधचित्त राहून अशीच पोलादी एकजूट टिकवून ठेवा! महागाईसोबतच, जातीय आणि धार्मिक विद्वेषाचं वारे, आगामी निवडणुकांच्या निमित्ताने वाहण्यास सुरुवात झालीय, त्यात वाहवत जाऊ नका; कारण, यात सर्वप्रथम शेतकरी-कामगारवर्गच भरडला जातो. **'समाजाकडून एकवेळ शेतकऱ्याला सहानुभूती मिळेल; मात्र, कामगाराला तीदेखील मिळत नाही', हे लक्षात ठेवा!'' अशा निर्णायक व निर्धारी शब्दांत राजन राजे यांनी, उपस्थित कामगारांमध्ये वैचारिक स्फुल्लिंग चेतवले व कामगार-चेतना जागृत केली.**

कंपनीमध्ये कॉर्पोरेट अफेयर्स डिपार्टमेंटमध्ये काम करत असल्यामुळे, निरनिराळी ब्रोशर्स, प्रदर्शन सामुग्री, वार्षिक अहवाल अशा अनेक गोष्टी बनवणे, छापून घेणे, पोष्टात/कुरियरकडे देणे इत्यादींची जबाबदारी असायची आणि मुख्य म्हणजे, टाईट-डेडलाईन्स असायच्या...

त्याकाळात डिजिटलायझेशन/कॉम्युटर्स अजून यायचे होते. त्यामुळे कागदांवरच्या प्रिंटिंगला पर्याय नव्हता. आमचा एक प्रिंटर ठरलेला होता, देशपांडे मालक-चालक होते. ऑफिसच्या जवळ होता, कमी चार्जेस लावायचे.

एकच प्रॉब्लेम होता, ऑर्डर घेताना मान्य केलेल्या तारखेला/वेळेला मटेरियल मिळेल याची शाश्वती नसायची. तरीदेखील मी देशपांड्यांना काम द्यायला प्राधान्य द्यायचो; कारण, देशपांडे स्वतः डोळ्यांच्या खाचा होईपर्यंत, प्रत्येक प्रूफ तपासून, मगच स्ट्राईक ऑर्डर जायची. रात्री-रात्रीपर्यंत ते स्वतः बसायचे. त्यामुळे देशपांड्यांकडे काही छापायला दिले की, पुन्हा नजर फिरवण्याची गरज नसायची. कंपनी लिटरेचरमध्ये गंभीर चुका, व्यवस्थापन गंभीर गुन्हा मानायचे!

फक्त लँडलाईन होते, मोबाईल नव्हते. त्यामुळे फॉलोअप करायला, मटेरियल घ्यायला मी जायचो आणि जवळपास प्रत्येकवेळी डिलिव्हरीची ठरलेला दिवस/वेळ पाळली जायची नाही. मी अस्वस्थ व्हायचो. मी रागावून आवाज चढवायच्या बेतात यायचो आणि देशपांडे आपल्या कुलकर्णीनामक प्रिंटिंग प्रेसच्या मॅनेजरला माझ्यासमोर इंटरकॉमवरुन बोलावून घ्यायचे...

मी जेवढा आवाज चढवणार नाही, त्यापेक्षा मोठ्या आवाजात देशपांडे, कुलकर्णींना भोसडायचे, अगदी घाण-घाण बोलायचे. अनेक लिंगवाचक शिव्यांची लाखोली... कुलकर्णी थोडाबहुत डिफेन्स करायचे; पण, पूर्णवेळ खाली मान घालून उभे राहायचे.

हे सुरुच असायचे. जोपर्यंत मी स्वतःहून ''जाऊ दे देशपांडे'' म्हणायचो. अजून दोन दिवस वाढवून द्यायचो (कारण तेवढे कुशन मी ऑर्डर प्लेस करताना ठेवलेले असायचे) आणि हा सिलसिला अनेक वर्षे सुरु राहिला...

---------------------------

निवृत्त झाल्यावर, माझ्याच जवळपास वयाचे असणारे कुलकर्णीदेखील निवृत्त झालेले असल्यामुळे, एकदा कोठेतरी भेटून गप्पा मारायला भेटले. साहजिकच अनेक वर्षे बोचणारा प्रश्न त्यांना विचारला. डिलिव्हरीला उशीर व्हायचा म्हणून मी आणि माझ्यासारखे कस्टमर नाराज व्हायचे. देशपांडे तुम्हाला बोलावून जाब विचारायचे हे ठीक; पण, देशपांडे तुम्हाला एवढ्या घाण-घाण शिव्या देत, तरी तुम्ही त्या एवढ्या शांतपणे उभे राहून ऐकून कशा घ्यायचात? त्यावर जोरजोरात हसत कुलकर्णी म्हणाले, ''अहो, मला शिव्या खाण्याचा वेगळा अलाउन्स द्यायचे देशपांडे!''

पोलिटिकल इकॉनॉमीमध्ये कॉर्पोरेट/ वित्त भांडवल आणि त्याचा राज्यकर्ता वर्ग हा, 'देशपांडे' आहे आणि राजकीय नेते त्यांचे 'कुलकर्णी' आहेत...

राजकीय अर्थव्यवस्थेतून तयार होणाऱ्या रक्तरंजित प्रश्नांवरुन, सामान्य नागरिकांकडून शिव्याशाप फक्त, कुलकर्णींनी खाण्याचा अलिखित-करार या देशपांडे आणि कुलकर्णी यांच्यात आहे!

प्रिंटींग प्रेसवाले देशपांडे, कुलकर्णी यांना 'शिव्या-अलाऊन्स' वेगळा द्यायचे, इथे खोके/पेट्या पोहोचतील याची व्यवस्था केली जाते. महिन्याला जेमतेम २०,००० ते ४०,००० रुपये मिळवणाऱ्या सामान्य नागरिकांना, खोके आणि पेट्यांमधले आकडे, पन्नास लाख, काही कोटी, आकाशाएवढे मोठे वाटतात... साहजिक आहे.

त्यांच्यासाठी जगातील संचित संपत्ती आहे ५०० ट्रिलियन्स डॉलर्स, जी सतत एक्सपोनेन्शियली साचत आहे. २०२७ पर्यंत ७०० ट्रिलियन्स डॉलर्स व्हायचे अंदाज आहेत. एक ट्रिलियन्स डॉलर्स म्हणजे, ८० लाख कोटी रुपये. ८० लाख कोटी म्हणजे, १,००,००,००० x १,००,००० x ८० रुपये असे ५०० वेळा... संपत्तीच्या फक्त १% ऐवज कुलकर्णींना दिला तरी, किती लाखो खोके/ पेट्या बसतील? पिंपातले एक वाटी पाणी!

**....संजीव चांदोरकर**

मालकांनी गावजेवण ठेवलेलं आहे.
सगळ्यांनी चुलबंद यायचं आहे.
पंगत देवळाच्या पटांगणात आहे.
पंगतीला बुंदी, गुलाबजाम, बर्फी, साधा-मसालेभात, वरण, शाकभाजी, कोशिंबीर, पुऱ्या सगळं आहे.
नक्की यायचं बरं.
अरे पण जेवण कधी आहे ?
मालकांच्या नातवाच्या बारश्याला ?
शाब्बास,
अजून मालकांच्या पोराचं लग्न नाही.
त्याचं लग्न कधी जमेल माहिती नाही.
लग्न जमलं तर, पोर होईल कधी माहिती नाही.
पोर झाल तरी तो नातू होईल की नात माहिती नाही,
पण जेवण आहे नक्की.
महिला आरक्षण हे असच जेवणाचं निमंत्रण आहे.
आरक्षण लागू कधी?
मतदारसंघ पुनर्रचना झाल्यावर.
पुनर्रचना कधी?
जनगणना झाल्यावर.
जनगणना कधी?
विधेयक आल्यावर?
विधेयक कधी ?
जातवार जनगणना करण्याचा गुंता सुटल्यावर.
याला म्हणायचं लबाडाघरच आवताण.
ताई माई अक्का,
याला किती भुलायचं ते तुमचं तुम्ही ठरवा.
महिला_आरक्षण
लबाडाघरचे_आवताण
निवडणूक_जीवी

*(समाजमाध्यमातून साभार....)*

सीबीआय-ईडी-आयटीसारख्या दमनकारी सरकारी-यंत्रणा, 'जी हुजूर' म्हणत दिमतीला असलेल्या केंद्रीय-सत्तेच्या हुकूम'शाही'चा आणि गुजराथी-भांडवलदारांच्या काळ्या पैशाचा माज व उन्माद, कुठल्या रावणापेक्षाही भयंकर अशा राक्षसीथराला या भाजपाई लोकांना नेत असताना, चक्षुर्वैसत्य पहाच... तरीही, बहुजनांना मूर्ख बनवत आपल्या नादी लावायला, ''मुँह में राम और बनावट 'हिंदुत्व' का नाम'' त्यांच्या मौजूद असतंच...!!!

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***


केंद्रीय अर्थ खात्याचे माजी सचिव सुभाष गर्ग यांनी आपल्या पुस्तकातून धक्कादायक माहिती समोर आणली आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, २०१८ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रिझर्व बँक ऑफ इंडियामध्ये साठवून ठेवलेले आरक्षित पैसे हे आपल्या निवडणूकीसाठी वापरायचे होते. त्याला रिझर्व बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर उर्जित पटेल यांनी विरोध केला.

तेव्हा उर्जित पटेल हे ''पैशावर बसलेले नाग आहेत'' असं भर मिटींगमध्ये त्यांचा उल्लेख केला गेला. त्यामुळे अखेरीस या तणावग्रस्त परिस्थितीमध्ये काम करणे काहीच उपयोगाचे नाही. म्हणून उर्जित पटेल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

त्यानंतर आपल्या मर्जीतील शक्तिकांत दास यांना त्यांनी रिझर्व बँक ऑफ इंडियावर गव्हर्नर म्हणून आणले. शक्तिकांत दास यांनी ह्या सुरक्षित ठेवलेल्या पैशातून १ लाख ७६ कोटी रुपये मोदी गव्हर्नमेंटला ट्रान्सफर केले आणि हे सगळे पैसे जाहीराती तसेच देशासाठी उपयुक्त नसलेल्या इतर कामांसाठी उधळले गेले. ही माहिती धक्कादायक आहे. पण, सुभाष गर्ग यांनी ती पुस्तकात स्पष्टपणाने लिहीली आहे.

पुस्तकाचे नाव.... "We also make Policy....."

*(समाजमाध्यमातून साभार....)*



# त्या सद्गृहस्थाचे एकेक चाळे आणि कारनामे काळे...

- पठ्याने इथला शेतकरी उध्वस्त केला!
- छोटा व्यापारी संपवला!
- बेरोजगारी वाढवली, 'अर्धरोजगारी' निर्माण केली... ४ काळ्या कामगार-कायद्यांची 'काळीकुट्ट कामगा-संहिता' लादून विदेशी व देशी (गुजराथी) भांडवलदारांच्या चांगभल्यासाठी 'कायम' असलेला कामगार-कर्मचारीवर्ग व कामगार-चळवळ संपवला!
- लघुउद्योग-मध्यमउद्योग खलास केला!
- सरकारी उद्योग-मालमत्ता विकत, बेलगाम खाजगीकरण करत, रुपयाची घसरगुंडी करत अर्थव्यवस्था मोडकळीस आणली!
- बँकांचा एनपीए (NPA) वाढवला... रिझर्व्ह बँकेच्या 'रिझर्व्ह-फंडा'ची लूट केली!
- सीबीआय, आरबीआय, निवडणूक आयोग व न्यायपालिकेच्या स्वायत्तेवर घाला घालून त्यांच्या गळ्यात श्वानांप्रमाणे पट्टे अडकवत, आपल्या इच्छेनुसार मनमानी पद्धतीने तो फिरवतोय!
- आपल्या आर्थिक-धोरणांमुळे गरीबांना तो अधिक गरीब करत 'दारिद्री-नारायण' बनवतोय...तर श्रीमंतांना अतिश्रीमंत करत, गौतम अदानीसारख्याला करोना-काळात, जगातला नं. २ चा धनाढ्य बनवून मोकळा होतोय!
- आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड तेल स्वस्त असताना, प्रचंड कर (टॅक्स) लावून जनतेला लुटतो!
- देशातील, पक्षातील कुणालाही विचारात घेत नाही... घटनात्मक-लोकशाही वगैरे मूल्ये, मुळातून या हुकूम'शहा'ला मान्यच नाहीत!
- शेतकरी आत्महत्या करत असताना, हा संवेदनशून्य गृहस्थ परदेशवाऱ्या करत रहातो... मणिपूर जळत असतानाही तोंडाला कुलूप लावत, कायम 'इलेक्शन-मोड' असणारा हा गृहस्थ, प्रचारासाठी खुशाल मोठमोठ्या मिरवणूका (रॅली) काढत रहातो!
- ना महिला-पहेलवानांना, ना मणिपूरच्या अभागिनींना, ना दुष्काळी प्रदेशातील अभावग्रस्तांना, आत्महत्याग्रस्तांना हा कधि भेटला... ना त्यांच्याविषयी एका शब्दानेही कधि सहानुभूती व्यक्त केली!
- महिला राष्ट्राध्यक्षाचाही उघड उघड अवमान करतो... पण कंगना राणावत, स्मृती इराणी, नवनीत राणा यांना मानपान आणि सत्तेचं 'नवनीत' मोकाट चाखू देतो!
- इथल्या तुरीला ६० रु. बाजारभाव देतो... पण, इराणची तूर १०० रु.ने आयात करतो... तेलबिया, डाळी तर, आयात करतोच; पण, इथल्या मालाची निर्यात मात्र विविध शुल्क लावून अप्रत्यक्ष रोखून धरतो!
- जिल्हा बँकेचे म्हणजेच, शेतकऱ्यांचे पैसे 'नोटबंदी'त बदलून देत नाही, मात्र शहाच्या जिल्हा बँकेत १३०० कोटी रु. ४ दिवसात बदलून देतो... 'नोटबंदी'च्या माध्यमातून शतकातला सगळ्यात मोठा घोटाळा करतो!
- देशातील जनतेपासून राफेल विमानांची किंमत दडवून ठेवतो... ५६० कोटींची 'चीज', १६०० कोटीला घेतो!
- कंपन्यांकडून पक्षासाठी करोडोंच्या देणग्या घेतो, बदल्यात त्या कंपन्यांना बक्कळ फायदा करुन देतो!




- देणगीदारांची नावे गुप्त ठेवण्यासाठीचा कायदा, गुप्त पद्धतीने करतो!
- पक्षासाठी अज्ञात स्त्रोतांकडून करोडोंची देणगी घेतो (म्हणजे काळा पैसा) स्विकारतो... देणगीदारांची नावे देशातील जनतेपासून लपवून ठेवतो!
- भ्रष्टाचारातून मिळवलेला हजारो कोटींचा पैसा पक्षनिधीत आणतो... निवडणुका जिंकण्यासाठी व विरोधी पक्षांची राज्य-सरकारे पाडण्यासाठी वापरतो!
- स्वतःची पाठ थोपटून घेण्यासाठी करोडोंच्या जाहिराती करून करदात्यांचा पैसा बरबाद करतो... कुनोच्या अभयारण्यात मुक्या बिचाऱ्या चित्त्यांचा बळी घेतो!
- याच्याच कुकर्माने पुलवामा-हत्याकांड घडतं, वरतून बालासोर-सर्जिकल स्ट्राईक करत, २०१९ च्या निवडणुका जिंकतो!
- लाखोंचे कोट घालून वर फकिर म्हणून मिरवतो!
- दिल्लीतील महिला-पहेलवानांपासून सुरुवात होत, मणिपूरच्या अभागिनी ते गुजराथच्या बिल्किस बोनो व मध्यप्रदेशच्या १२ वर्षांच्या बलात्कारपीडितेपर्यंत असंख्य महिला-बालिकांवरचे लैंगिक-अत्याचार देशात बेसुमार वाढत असताना... तिप्पट किंमत केलेल्या गॅस-सिलिंडरवर फक्त, २०० रु. सूट देत व महिला-आरक्षणाची नौटंकी करत, महिलासक्षमीकरणाच्या फुकाच्या बाता मारतो!
- १०० दिवसात काळा पैसा आणायच्या, प्रत्येकाच्या जनधन खात्यात १५ लाख रु. भरण्याची 'जुमलेबाजी' करतो... पण, दिडदमडीचा काळा पैसा आणत तर, नाहीच; पण, देशातील बँका लुटणाऱ्या 'मल्ल्या-मोदीं'ना परदेशात जायला एकप्रकारे मदत करतो, त्यातल्या एकालाही आजवर मुसक्या बांधून भारतात आणत नाही!
- भ्रष्टाचारावर मोठमोठ्याने बोंबलला; मात्र, लोकपाल व लोकायुक्त ५ वर्षात कधि नेमला नाही!
- विविध राज्यात इतर पक्षातील आमदारांना प्रलोभने दाखवून फोडतो... वरतून, "भारत, लोकशाहीची जननी" असल्याच्या भाकड गप्पा मारतो!
- शेकडो लोकं नोटबंदीच्या रांगांमध्ये दगावली आणि करोना-टाळेबंदीच्या काळात टाचा घासून मेली... तरी, पीएमकेअर फंडाचा हिशोब देत नाही!
- जनतेच्या कष्टाच्या पैशातून भांडवलदारांना लाखो कोटींची 'कर्जमाफी' आणि 'करमाफी' देतो!
- जीवनावश्यक मूलभूत प्रश्न सोडून लोकांना जातधर्माच्या क्षुद्र व हिणकस राजकारणात गुंतवून ठेवतो!
- अशा 'महाठगा'ला जनता चांगलीत ओळखून आहे... ती आता फक्त, लोकसभा निवडणूक-२०२४ ची वाट पहातेय, मोकळा श्वास घेण्याची पहाट, स्वतःच्या जगण्यात, तब्बल एका दशकानंतर आणण्यासाठी...!!!

*(समाजमाध्यमातून साभार.....)*

**"हा 'ध्रुव राठी'चा "दूध का दूध, पानी का पानी" करणारा 'पोलखोल' व्हिडीओ प्रसारित होऊन आज काही महिने उलटून गेलेले असले; तरीही, त्याची प्रासंगिकता आजही एवढी प्रभावी की, त्यातून एक गोष्ट निश्चित आपल्या ध्यानी येते की, आरोपी गौतम अदानी, त्याचे या भ्रष्टाचाराच्या महाभारतात (आजवर, याच्या आसपासचा देखील घोटाळा भारतात कधि झालेला नाही आणि कधि होऊ शकणार नाही व त्यासंबंधाने, रोज नवनव्या अहवालातून पुरावे बाहेर पडतायत) गुंतलेले सगेसोयरे-साथीदार (यात सरकारी-यंत्रणा व त्यातील अधिकारीवर्गही आलाच) आणि संबंधित सगळेच भाजपाई राजकारणी... या सगळ्यांनाच, देशाप्रति केलेल्या या एकूण घोर अपराधाबद्दल, केलेल्या 'देशद्रोहा'बद्दल अगदी 'फाशी' नाही; तरी, कडक कायदेशीर कारवाई करुन निदान तहहयात 'जन्मठेप', भोगायला लावलीच पाहीजे... हे होण्यासाठी प्रथम 'भाजपा'च्या काळ्याकुट्ट राजवटीचा अंत, २०२४ च्या लोकसभा-निवडणुकीतून घडवून आणणं, प्रत्येक अस्सल (संघ-भाजपावाल्यांसारखे 'नकली' नव्हेत) 'देशप्रेमी' भारतीय नागरिकाचं 'धर्मकर्तव्य'च आहे व त्याकामी, शिवबा-संतां'चं महन्मंगल 'हिंदुत्व' हृदयात बाळगणाऱ्या ('संघ-भाजपा'चे ढोंगी, बनावट, विद्वेषी 'हिंदुत्व' नव्हे) प्रत्येक भारतीय-नागरिकाला अतिशय जागरुक होऊन यापुढे लोकसभा-निवडणुकीत प्रचार, प्रसार व मतदान करावं लागेल...!!!"**

**...राजन राजे**
**(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

# महाराष्ट्रातील कामगार-कर्मचारीवर्गाचे ‘खलनायक’



**एकीकडे, महाराष्ट्र सरकार सरकारी-नोकऱ्यांचं मोठ्याप्रमाणावर ‘कंत्राटीकरण’ करत असताना; म्हणजेच, मराठी कामगार-कर्मचारीवर्गाचं ‘गुलामगिरीकरण’ करुन; तसेच, त्यांना आधुनिक ‘भांडवली-व्यवस्थे’तले ‘नव-अस्पृश्य’ बनवून... विकासाच्या व सुरक्षिततेच्या परिघाबाहेर ‘बहिष्कृत’ म्हणून निर्दयपणे ढकलून देत, त्यांचं अवघं भविष्यच अंध:कारमय करुन टाकत असतानाच... दुसरीकडे, नवीन पटनायकांचं २२ वर्ष सातत्याने सत्तेवर असलेलं ‘ओरिसा सरकार’, ओरिसातील युवक-युवतींना ‘कंत्राटीकरणा’च्या दास्यातून व जुलमी-पाशातून मुक्त करत, ‘कायम’स्वरुपी सेवा बहाल करत आहे!**

...शिवाय, पुन्हा म्हणून ओरिसात एकही युवक-युवती ‘कंत्राटी-कामगार पद्धती’तील गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेत कामावर ठेवली जाणार नाही, याचाही जाहीर वज्रनिर्धार नवीन ‘पटनायक’ यांनी केलेला आहे. अशारितीने, ओरिसात नवीन पटनायक, ओरिसातील शोषित-वंचित कामगार-कर्मचारीवर्गाचे ‘नायक’ बनले असताना... ‘अजितदादा, देवेंद्रजी किंवा एकनाथजी’ ही त्रिमूर्ती (हवंतरं, ‘ट्रिपल-इंजिन’ म्हणा) महाराष्ट्रातील कामगार-कर्मचारीवर्गाचे ‘खलनायक’ ठरले आहेत!

...म्हणूनच तर, ट्रिपल-इंजिन सरकार असूनही यांची महाराष्ट्रातील ‘त्रिशंकू’ अवस्था काही संपत नाही; तर, तिकडे तब्बल २२ वर्ष उलटून गेली; तरीही, ओरिसात एकहाती नवीन पटनायक, ‘जननायक’ म्हणून टिकून-टिच्चून आहेत... सरकार टिकवायला किंवा ‘मी पुन्हा येणार’ म्हणतं सत्तेत यायला, नवीन पटनायकांना ना ‘खोक्यां’चा आधार घ्यावा लागत ना ‘ईडी-आयटी-सीबीआय’सारख्या सरावलेल्या गुरकावणाऱ्या ‘बोक्यां’चा!

**‘‘भूदासांना मालकी-हक्काने जमिनीचे पट्टे कसायला देऊन त्याच्या जीवनात सुखासमाधान व सुरक्षितता निर्माण करणारे (म्हणजेच, आजच्या परिस्थितीतल्या परिभाषेत ‘कंत्राटी-कामगारां’ना नोकरीत ‘कायम’ करणारे) शिवछत्रपती व ‘समतेचा संदेश’ देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्या महाराष्ट्राच्या लालकाळ्या मातीत होऊन गेले... त्याच पावन महाराष्ट्राची, मतं मिळवण्याच्या राजकीय सोयीसाठी उठताबसता ‘जय शिवाजी’, ‘जय भीम’ म्हणणाऱ्या पातक्यांनी... काय वासलात लावून ठेवलीय, काय दयनीय अवस्था केलीय... ती जरा नीट डोळे उघडून पहाच...!!!**

खरंतरं, सरकारी-आस्थापनांमध्ये ‘कंत्राटी-कामगार पद्धत’ नावाची अवदसा शिरणं, हे मुळातूनच... ‘शिवबा-संतां’च्या जाज्वल्य-महन्मंगल ‘हिंदुत्वा’ला, भारतीयत्वाला; तसेच, भारतीय-राज्यघटनेच्या चौथ्या भागातील (DPSP... Directive Principles of State Policy) मूळ आधारभूत तत्त्वांना हरताळ फासणंच होतं. तत्कालीन प्रस्थापित राजकारण्यांनी वहात्या गंगेत हात धुवून घेत, एकदा केलेलं हे सरकारी-नोकऱ्यांचं कंत्राटीकरण रद्द करणं, ही तशी फार अवघड बाब नव्हेच; खरी कसोटी, देशातील रक्तपिपासू-शोषक ‘भांडवली-व्यवस्थे’ला (Vampire-State System) आव्हान देत... **खाजगी उद्योग व सेवा क्षेत्रातील निळ्या व पांढऱ्या कॉलरच्या नोकऱ्यांचं ‘कंत्राटीकरण’ कायमचं संपवताना व त्याचबरोबर, उन्मत्त झालेल्या काश्मिरी किंवा नक्षलवादी दहशतवादापेक्षाही जास्त समाजघातकी असलेल्या ‘कंपनी-दहशतवादा’चं (Corporate-Terrorism) उच्चाटन करताना लागणार आहे... आहे कुठल्या प्रस्थापित राजकीय पक्षाची तेवढी राजनैतिक ताकद किंवा राजकीय इच्छाशक्ति???**

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

---



मुरबाड तालुक्यातील, साजगाव ग्रामस्थांनी ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मा. राजन राजे यांना, नवरात्रौत्सवानिमित्त, आग्रहपूर्वक आमंत्रित करुन, त्यांचा हृद्य सत्कार केला.

**याप्रसंगी, ‘धर्मराज्य पक्षा’चे जुनेजाणते कार्यकर्ते व पदाधिकारी श्री. समीर चव्हाण यांचाही साजगाव ग्रामस्थांतर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारप्रसंगी भाषण करताना मा. राजन राजे म्हणाले की, ‘‘आपल्या ग्रामस्थांकडून ‘घरचा सत्कार’ होणं, ही खचितच अधिक आनंद देणारी बाब आहे. जवळपास गेले दीड तप चालू असलेल्या या उत्साही कार्यक्रमातून, ग्रामस्थांचा जो एकोपा दिसून येतो, तो वाखाणण्याजोगा आहेच; पण, हा उत्साही-उपक्रम इथपर्यंतच मर्यादित राहायला नको. आपल्याकडे महाराष्ट्रात जशी भजनी-मंडळं किंवा इतर सांस्कृतिक-कार्यक्रम मंडळं असतात... तशी, बिहारमध्ये ‘अभ्यास-मंडळं’ असतात, ज्यामधून इयत्ता चौथीपासूनच खास प्रशिक्षण देऊन, IS/IPS उच्चपदस्थ केंद्रीय प्रशासकीय अधिकारी घडवले जातात. खरी सत्ता, अर्धवट शिक्षण अथवा प्रशासकीय फार ज्ञान नसलेल्या राजकारण्यांकडे असण्यापेक्षा, ती या दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे असते. आपल्या गावागावातून असे उच्चपदस्थ व उच्चशिक्षित अधिकारी-व्यावसायिक घडवण्यासाठी अगदी बालपणापासूनच, तुमच्यासारख्या नवतरुण मंडळींनी मनापासून प्रयत्न करायला हवेत. सुदैवाने, आपल्या गावातल्या या मंडळाचं नावदेखील, ‘नवतरुण मित्र मंडळ’ आहे. तेव्हा, आपल्या नावाला साजेसं मोठं सामाजिक-शैक्षणिक कामही आपल्या सर्वांच्या हातून घडो, हीच माझी माता दुर्गादेवीच्या चरणी प्रार्थना राहील... आपणा सर्वांनी ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे नवरात्रौत्सवाला आमंत्रित करुन, माझा सत्कार केल्याबद्दल, मी मनापासून आपले आभार व्यक्त करतो!’’ अशा शब्दांत मा. राजन राजे यांनी, आपल्या भावना व्यक्त केल्या.**

दरम्यान, ‘नवतरुण मित्र मंडळा’चे अध्यक्ष श्री. चेतन सूर्यराव, उपाध्यक्ष श्री. केतन सूर्यराव, सायले-साजगाव ग्राम पंचायतीचे उपसरपंच श्री. राकेश सूर्यराव, धसई उपविभागीय अधिकारी श्री. नारायण सूर्यराव, पोलीस पाटील श्री. संदीप देशमुख तसेच, मंडळाचे कार्यकर्ते व हितचिंतक यावेळी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# सूड कितीही भीषण असला तरी, तो जेव्हा गाझापट्टीतून येतो, तेव्हा तो निश्चितच 'जंगली-न्याया'चं स्वरुप लेवूनच येतो...

## म्हणूनच, या जगाला आज, एखादा तरी 'गांधी', एखादा तरी 'बुद्ध' हवा..!!!

**आजचं आधुनिक जग, प्रचंड समृद्ध व संसाधनसंपन्न असूनही प्रचंड अस्वस्थ असणं... चंद्रसूर्य, मंगळापर्यंत मानवी-अंतराळयाने पोहोचूनदेखील माणूस माणसापर्यंत पोहोचू न शकणं... हा सगळा एकूणच, म. गांधी, आजच्या जगात नसल्याचा अतिशय गंभीर व विध्वंसक परिणाम आहे!**

आताच्या जगात पुतिन आहेत, ट्रंप-बायडेन आहेत, नेत्यान्याहू, शि जिनपिंग आहेत आणि हो नरेंद्र मोदीदेखील आहेत... पण, गांधी नाहीत, नेहरु नाहीत आणि मोदींना 'राजधर्म' पाळायला सांगणारे, बाजपेयीदेखील नाहीत!

**इस्त्रायलवरचा हमासचा नृशंस हल्ला आणि आता इस्त्रायलने गाझापट्टीत चालू केलेला भीषण नरसंहार... याने जगभरातल्या प्रत्येक संवेदनशील माणसाचं हृदय कंप पावत असताना, अंतःकरण विदीर्ण झालेलं असतानाच...मणिपूरविषयी तोंडाला कुलूप लावून बसलेले काही भाजपाई डोमकावळे, इस्त्रायलच्या बाजुने कर्णकर्कश्श काव काव करायला लागलेत... तर कर्नाटक निवडणुकीनंतर पाचावर धारण बसून, वाचा गमावलेले काही भाजपावाले, पोपटासारखे बोलायला लागलेत!**

याचाच अर्थ, मणिपुरच्या आदिवासी कूकी जनतेचा धर्मबदल-रक्तबदल करुन ते, पेगॅसस-सॉफ्टवेअर पुरवणारे (येत्या लोकसभा-निवडणुकीतील इस्त्रायली-तंत्रज्ञानाधारित संभाव्य EVM-टॅम्परिंगचा मुद्दाही इथे ध्यानात असू द्या) इस्त्रायली-यहुदी बनल्यावरच भाजपाई सरकारला जाग येणार होती काय?

दोन्ही बाजुंकडील अमानुष नरसंहार आणि भयंकर क्रौर्याच्या पार्श्वभूमीवर 'भाजपा'वाल्यांनी तत्परतेनं राजकीय फायदा उचलण्याचा प्रयत्न करणं, ही भाजपाई-संघीय विकृत-नृशंस विचारसरणीचं निदर्शक होय.

...गोष्टी एवढ्या थराला गेल्यात की, कोण कुठले किडूकमिडूक वेदान्ती उठलेत आणि समाजमाध्यमातून सांगत सुटलेत... 'यहुदी' म्हणजे, यहुदी शब्दाचा अपभ्रंश झालेले सौराष्ट्राचे 'यादव'च; म्हणजेच, आपले बंधूच!

**त्यांना यादवी-भाषेतच (अर्थातच, हिंदी) सांगायला हवं, "जब इंडिया में आपके मुताबिक, गौमाता को पालनेवाले (हिंदू) और गाय को खानेवाले (मुस्लिम) भाई-भाई नहीं हो सकते, तो इज्राइलवाले, जो सबकुछ खाते हैं... वो 'यहुदी' लोग, कब और कैसे 'यदुवंशीयों' के भाई बन गये...???"**

हो, यहुदी धर्मातल्या एका महान गुणधर्माला सलाम, जो एतद्देशीय हिंदू धर्मात आढळतो.. तो म्हणजे, धर्मप्रसारासाठी अनैतिक मार्गांचा, ना त्यांनी कधि अवलंब केला ना कधि स्विकार. कुणाचंही आमिष दाखवून, फसवणूक करुन अथवा तलवार-बंदुकीच्या धाकावर जबरदस्तीने यहुदी धर्मांतर करीत नाहीत. पण, ती हिंदू धर्मासारखी (अर्थातच, शिवबा-संतांचा हिंदू धर्माविषयी बोलतोय आपण, भाजपाई किंवा संघीय विकृत हिंदुत्वाविषयी नव्हे) सोज्वळ भूमिका नाही; तर, अतार्किक अशा, धार्मिक-कर्मठतेतून आलेली आहे, हे विसरुन चालणार नाही... त्यामुळेच, ज्या भाजपाई बेगडी-बनावट हिंदुत्ववादी लोकांना बिनकामाचे 'साधर्म्य' शोधायचंय, त्यांना हे आयतं खाद्य मिळायला नको!

**जगभरातील, विशेषतः भारतीय, भांडवली-मिडीयातून हमासने केलेल्या अत्याचार व नरसंहाराचे बरेच 'बनावट व्हिडीओ'देखील समाजमाध्यमातून प्रसारित करणं चालू असल्याच्या बातम्या थडकत असतानाच, हमासचे प्रवक्ते गाझी हम्माद, "आम्ही लहान मुलं आणि स्त्रिया, यांच्यावर कुठलेही अत्याचार केले असल्याचे सिद्ध करुन दाखवाच", असं उघडं व ठामपणे आव्हान देतायत... ते गांभीर्याने घ्यायला, कुणाची हरकत नसावी.**

**यासंदर्भात, भारतीय लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला भावपूर्ण श्रद्धांजली वाहत, खासमखास ८ पत्रकारांना ९० तासात इस्त्राईलला जाण्यासाठी व्हिसा मिळाल्याचा संदेश, समाजमाध्यमातून सर्वत्र फिरतोय (प्रत्येकी व्हिसा खर्च २ लाख रु.... मात्र, १४० दिवस उलटूनही आपले 'गोदी-मिडीया'वाले पत्रकार मणिपूरला अद्याप पोहोचलेले नाहीत, मणिपूर तिकीट तर फक्त १५०० रु. आहे).**

अमेरिका-इस्त्रायल यांचं 'भांडवली-व्यवस्थे'तलं क्रौर्य-आतंकवाद, त्यांचा जाळूनपोळून काढणारा 'भांडवली-अहंकार' एका बाजुला आणि दुसऱ्या बाजुला 'हमास-आयसिस'सारख्या संघटनांचा धर्मांध-दहशतवाद... या दोन्हींचा धि:क्कार करत असताना, अशा प्रवृत्तींचा अंत होणं किंवा केला जाणं, या जगाच्या कल्याणासाठी अत्यावश्यक आहेच. पण, एकवेळ, ही हमास-हिजबुल्ला-आयसिस-तालिबानसारखी धर्मांधता किंवा भाजपाई-संघीय धर्मविद्वेष... कधिकाळी आवरता येईल, संपवता येईल. पण, 'भांडवली-व्यवस्था' संपवणं, ही अखिल मानवी-कल्याणासाठी कितीही अत्यावश्यक बाब असली; तरीही, *...(पान क्र. १० वर)*

**अमेरिका-इस्त्रायल यांचं 'भांडवली-व्यवस्थे'तलं क्रौर्य-आतंकवाद, त्यांचा जाळूनपोळून काढणारा 'भांडवली-अहंकार' एका बाजुला आणि दुसऱ्या बाजुला 'हमास-आयसिस'सारख्या संघटनांचा धर्मांध-दहशतवाद... या दोन्हींचा धि:क्कार**





*...(पान क्र. ९ वरुन)*

ते कर्मकठीण आहे, हे नीट ध्यानात घेतलं पाहीजे. भांडवलशाही किंवा 'भांडवली-व्यवस्था', माणसातल्या पशुतुल्य वासनांना व संवेदनशून्यतेला बेफाम मोकाट सोडणारी आणि त्यावर कुणाचंही धड पूर्णपणे नियंत्रण नसणारी; तसेच, जगभरातल्या, वरपासून खालपर्यंत, सगळ्याच जनतेला आपलं आत्मघातकी अनिवार 'व्यसन' जडवणारी अशी... एक सर्वव्यापक 'स्वयंचलित' यंत्रणा-मंत्रणा असल्याने, ती मानवासह एकूणच सजीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी कितीतरी अधिक धोकादायक होय!

**...म्हणूनच, जगत-कल्याणासाठी, या समस्येवर मुळातून कायमस्वरुपी उपाय म्हणून 'मालक/व्यवस्थापक आणि कामगार' असे जे शोषक व शोषित 'वर्गसंघर्ष' व निर्मम-शोषक 'वर्गसंबंध' (जसे पूर्वी मालक-गुलाम व सरंजामदार-भूदास वर्गसंबंध होते) आहेत, ते संपवण्यासाठी... साम्यवादी-विचारसरणीचा प्रयोग फार काळजीपूर्वक (त्याकामी, रक्तरंजित-क्रांति अजिबात नव्हे; तर, रक्तविहीन; पण, मोठ्या त्यागातून निर्धारपूर्वक केलेल्या राजकीय-जागृतीद्वारेच व्हायला हवी); पण, तातडीने केले जाणं अत्यावश्यक आहे. जगात अमन-शांति प्रस्थापित होण्यासाठी 'साम्यवाद आणि गांधीवाद', हातात हात घालून चालला पाहीजे!**

जागतिक-तापमानवाढीच्या महासंकटातसुद्धा अजूनही लोकांना आपापल्या धर्मश्रद्धांना प्राणापलिकडे कवटाळून बसावसं वाटणं, हे माणसांमधली संवेदनाचं नव्हे; तर, 'शहाणपण'ही संपुष्टात येत चालल्याचं, दुर्दैवी लक्षण नाही, तर दुसरं काय आहे?

या एकूण घटनाक्रमाबाबत, सर्वात घातकी भूमिका तथाकथित मुस्लिम-राष्ट्रांची आहे... गाझापट्टीची एवढी दशके मुस्कटदाबी चालू असूनदेखील त्यांना इस्रायलशी दोस्ती कराविशी वाटणं; ही त्यांची, एकाबाजुला राजकीय 'अपरिहार्यता' (आधुनिक इस्रायली-शेतीतंत्र मिळवण्यासाठीच ते आतूर झालेले; कारण, आता जागतिक-तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर त्यांना आपल्या अर्थव्यवस्थेचं खनिज-इंधनावरचं असलेलं मोठं अवलंबन कमी करायचंय) आणि दुसऱ्याबाजुला स्वतःच्या राजकीय-संरक्षणासाठी इस्रायलकडून 'पेगॅसस'सारख्या, विरोधकांवर अचूक व करडी नजर ठेवणाऱ्या 'हेरगिरी-यंत्रणा' त्यांना हव्यात (आपल्या सर्वोच्च न्यायालयानं 'सर्वोच्च-हतबलता' दाखवलेलं, भारतातलं 'मेड इन इस्रायल' पेगॅसस-प्रकरण आठवा!).

**साधं मसाल्याच्या पदार्थातलं आले (Ginger), बटाट्याच्या चिप्सदेखील... गाझापट्टीमध्ये नेण्यावर पॅलेस्टाईनींना इस्रायलींकडून बंदी कशासाठी? ते काही बॉम्ब बनवण्याचं साहित्य आहे की काय??**

...कशासाठी, तर चोवीस तास, वर्षाचे बारा महिने पॅलेस्टाईनींना सतत अपमानित करत, आपलं क्रूर वर्चस्व गाजवण्यासाठी आणि त्यांचा उठताबसता अपमान करण्यासाठीच केवळ... ते इस्रायली लष्करी व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून केलं जातं होतं. एवढंच काय ऑस्लो-करारानंतर शांतता-प्रस्थापनेसाठी शस्त्रं खाली ठेवणाऱ्या पॅलेस्टाईन नेते यासर अराफत यांचीही इस्रायलकडून सातत्याने मानखंडना होत गेल्याचं बोललं जातं व त्यांचा बंदीवासात झालेला संशयास्पद मृत्यू, हे आजवरचं एक न उकललेलं मोठं गूढच. यासंदर्भात, २००२ ते २००६ इस्रायलचे पंतप्रधान असलेले एरियल शेरॉन, यासर अराफत यांच्याबाबत अवाजवी व अन्यायकारक कठोर निर्णय घेताना, यासर अराफत यांचे सल्लागार मोहम्मद रशिद यांना म्हणाले होते, "You guys know my policy, anybody who is perceived to be threat to Israeli people, I will handle him, I will remove him!"

...मग, भारतात गाजलेल्या इस्रायली 'पेगॅसस-सॉफ्टवेअर प्रकरणा'नंतर, आमचाही सवाल आहे की, "What if, Israel is threat to our nation's democracy...???"

अनेक प्रसंगी, इस्रायली सैनिकांकडून नेमबाजीचा सराव निःशस्त्र पॅलेस्टाईनींवर गोळ्या झाडून केला जात असताना, कोणाचंही अंतःकरण कधि द्रवलं नाही... त्यांना शस्त्रं खाली टाकून गाझापट्टीत अतिशय दाटीवाटीने खुल्या तुरुंगातल्या नरकयातना पत्करायला लावल्यानंतरही नाही (खोटे आरोप लावून किंवा किरकोळ अपराधासाठी, प्रदीर्घकाळ इस्रायलच्या तुरुंगातल्या मरणयातना सोसणाऱ्यांची तर, गणतीच नाही). दिवसाची फक्त चार तास वीज उपलब्ध आणि कॅलरी मोजून अन्नधान्याचं 'रेशनिंग', कामाच्या ठिकाणी अतोनात शोषण व नोकरीतील असुरक्षितता, इस्रायलींकडून रहात्या घरातून कधि जोरजबरदस्तीने हुसकावून लावलं जाईल, याचा कुठला धरबंध नाही व नेमही नाही... ही माणुसकीची की, विकृत हिंस्रतेची लक्षणं? त्यामुळेच, 'करा किंवा मरा', या निर्वाणीच्या स्थितीत पॅलेस्टाईनी जाऊन पोहोचले आणि 'हमास'ला आश्रय देऊन तिला मोठे करते झाले (प्रत्यक्षात, 'हमास'ला मोठं करण्यात नेत्यान्याहूंचं कुटील राजकारणच कारणीभूत होतं, ही वस्तुस्थिती आहे)

**आता तर, अरण्यात हाकारे देऊन श्वापदांना कोंडून मारतात... त्यापेक्षाही, अधिकच्या क्रौर्याने लाखो पॅलेस्टाईनी तहानभुकेने व्याकूळ करुन, औषध-उपचारावाचून अनन्वित हाल हाल करुन मारणार किंवा हवाई-मैदानी जंग करुन मारणार.. वा रे इस्रायल, वा रे व्वा (यहुद्यांचा याहोवा, हा देवदेखील फार रागीट प्रवृत्तीचाच... तो कायमच किंचितही माफी न देता, कडक शिक्षा देण्याच्याच भूमिकेत असावा?)! यहुद्यांचा-ज्यूंच्या परमपवित्र जुन्या कराराच्या (Old Testament) हिब्रू-बायबलमध्येच 'डोळ्याच्या बदल्यात डोळा', ही जंगली-खुनशी सूडात्मक भूमिका असेल; तर, मग सगळंच, आजवरचं इस्रायली निर्दय, प्रतिशोधाचं रक्तरंजित-राजकारण सहजी उलगडू लागतं. इथेच म. गांधीच्या ''डोळ्याच्या बदल्यात डोळा, या भूमिकेतून सगळं जगचं 'आंधळं' होऊन जाईल'', हे महान प्रतिपादन, प्रकर्षानं हृदयाच्या अंतर्हृदयाला जाऊन भिडतं... जेव्हा, परमात्म्याच्या संजीवक आविष्काराचाच, असा 'क्रूर संकोच' होऊ पहातो; तेव्हा, हमासची गाझापट्टी असो वा हिटलरची जर्मनी... जगात कुठेही, 'मोहनदास करमचंद गांधी' नावाच्या 'महात्म्याच्या महानतेची महती', आपल्याला तळमळून ओळख पटवत रहाते.**

२०१४ साली गाझामध्ये २२०० लोकं मारली गेली... त्यात ७०% नागरिक होते; तर, इस्रायलचे ६०० लोक मारले गेले, त्यापैकी फक्त १५% नागरिक होते. २०१८-१९ मध्ये इस्रायलचा एक माणूस मारला गेला, दहा जखमी झाले; तर, बदल्यात गाझापट्टीतली २२० लोकं मारली गेली आणि त्यादरम्यान, ९२०० लोकं जखमी झाली होती, हे विचारात घ्यायला नको?

जगभरातल्या सगळ्याच मानवी वेदना-संवेदनांसाठी आपला जीव कळवळला पाहीजे, अंतःकरण पिळवटलं पाहीजे... अगदी, मणिपूरपासून ते थेट गाझापट्टी-वेस्टबँकपर्यंत... मग यातना-वेदना कुणाच्याही असोत, जीव कुणाचाही जात असो!

**गाझापट्टी-वेस्टबँकमधलं शापित-अपमानित जगणं, रोजच्या मरणयातना भोगणं... आपल्याच मरणांचा उत्सव, इस्रायलींकडून साजरा केला जाताना उघड्या डोळ्यांनी पापण्या उचकटून असहाय्यतेनं पहात रहाणं... यातून गाझापट्टीत, खालून ज्वालामुखी नाही उसळणार तर, काय वरुन थंडगार गारा बरसत रहाणार? त्यातून, दुर्दैवाने जर अशा विस्फोटक परिस्थितीला 'धर्मविद्रेषा'ची फोडणी असेल... तर, दोन्ही बाजुंकडील क्रौर्य, कुठल्या परिसीमा ओलांडू शकेल, याची कल्पनाही अंगावर सरसरुन काटे-शहारे आणणारीच!**

डावी-क्रांती हवीच; मात्र ती, डावी साम्यवादी क्रांति, बंदुकीच्या नळीतून अजिबात व्हायला नको...जोवर, भांडवली-व्यवस्था तुम्हाला नेस्तनाबूत... *(पान क्र. ११ वर)*

**संजीव चांदोरकरांसह अनेक विचारवंतांनी, डॉक्टर्स, विधिज्ञ, प्राचार्य-प्राध्यापक-शिक्षक आणि पत्रकारांनीदेखील, या इस्रायल-हमास संघर्षावरील आपल्या संदेशाचं मनापासून स्वागत केलं, याचं जरुर अप्रूप आहे.**

पण, महत्त्वाची बाब ही की, या भीषण-संहारक पार्श्वभूमीवर जागतिक भांडवली-जगतातील निर्दयता, अमानुषता चव्हाट्यावर यायला हवीच. कारण, अशी थेट सत्याच्या आसाला भिडणारी मांडणी करण्याची हिंमत, 'भांडवली-बोरुबहाद्दरांच्या लेखणी'ला ('गोदी-मिडीया'च्या बड्या वृत्तपत्रांतील रविवार-पुरवणीतले लेख नजरेखालून घातले की, हे सहजी ध्यानात येईल) चुकूनही नसते. ते फारतर, गरजेपुरती आडवळणं घेत रहातात (ज्याला, "Beating around the bush" म्हणतात), भांडवली-संसाधनसंपन्न पत्रकारितेतील आपला व्यासंग दाखवणारा भाराभर तपशील ओतत रहातात...पण, अंति त्यातून, साररुपाने तुमच्या हाती, ते काहीच लागू देत नाहीत. कुकरच्या व्हॉल्व्हसारखी भूमिका पार पाडत, समाजातील वाढत्या असंतोषाच्या वाफेला आपल्या लेखणीद्वारे छोटीशी वाट मोकळी करुन देत, तो असंतोषाच्या वाफेचा दाब, विशिष्ट मर्यादेत राखतात...जेणेकरुन कुकरच्या अस्तित्वाला (थोडक्यात, निर्मम-शोषक भांडवली-व्यवस्थेला) जराही धोका कधि पोहोचू नये. तशी दक्षता, ते अगदी बेमालूमपणे कायमच घेत रहातात...असो!

**आज भांडवली-व्यवस्थेमुळेच केवळ, अवघ्या सजीवसृष्टीच्या मुळावरच उठलेलं 'जागतिक तापमानवाढ व हवामान-बदला'चं जागतिक-महासंकट उद्भवलंय... तसेच, रशिया-युक्रेन किंवा इस्रायल-हमास, असं रौद्रभीषण क्रौर्यही त्यातूनच थैमान घालतंय, हे कुणीतरी थेटपणे जनतेच्या नजरेस आणून द्यायला नको? आधुनिक-तंत्रज्ञानाद्वारे जगाच्या पाठीवर पृथ्वीमातेच्या चाललेल्या असह्य दोहनातून एवढी महाप्रचंड भौतिक-प्रगती साध्य केल्यानंतरही, शोषण-व्यवहारातील, अमानुषतेचा कहर गाठला जात रहाणं, हे भयंकर आक्रित; फक्त आणि फक्त, रक्तपिपासू-निर्मम-शोषक भांडवली-व्यवस्थेतच (Vampire-StateSystem) घडू शकतं... या सगळ्याला पर्याय, 'साम्यवादी-गांधीवादी' विचारसरणीचा संगम, हाच असू शकतो, हे ही गर्जून सांगायला नको??**

...एवढं सगळं विस्फोटक रामायण-महाभारत आजुबाजुला घडत असताना, कुणाला त्याचा फारसा खेद-खंत नसणं, हे फारच धोकादायक आहे. म्हणूनच, श्रीकृष्णाच्या गीतेतल्या संदेशानुसार न थकता, न कचरता आपण आपलं कर्तव्य पार पाडत जायचं... सर्वसामान्य जनता जेव्हा, जागी होईल तेव्हा होईल. या लोकशाहीत दूरदर्शी, बावनकशी वैचारिक-मांडणी करुन लोकजागृतीचा प्रयत्न सातत्याने करणं, एवढंच आपल्या हाती असतं. सरतेशेवटी जे काही होईल ते पहाणं, पहात रहाणं... हेच आपलं प्राक्तन असणार, दुसरं काय... वाचकांना मनःपूत धन्यवाद!

***...राजन राजे***
***(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

*जो आतून स्वतः मरणाचा भेदरलेला असतो; तो बाहेरुन दुसऱ्याला घाबरवण्याच्या सदैव प्रयत्नात असतो!*

*हत्तीसारखा महाकाय-बलशाली प्राणी, आपल्या गल्लीत शिरलेला पहाताच गल्लीतली कुत्री, आपल्या साथीदारांना बोलावून गोळा करतात व अगदी 'कोरस'मध्ये; पण, लांबूनच जोरजोरात भुंकत, हत्तीला घाबरवण्याच्या प्रयत्नाला लागतात...*

*...हल्लीची सत्ताधारी माणसं, त्याकामी सीबीआय, आयटी, ईडीला सांगावा धाडतात...!!!*

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

## म्हणूनच, या जगाला आज, एखादा तरी 'गांधी', एखादा तरी 'बुद्ध' हवा..!!! ...(पान क्र. १० वरुन)

करण्यासाठी क्रूरपणे बंदुका चालवत नाही (जसं, युरोप-अमेरिकेत 'सोशॅलिझम-कम्युनिझम' दडपण्यासाठी घडलं होतं); तोवर तर, तुम्ही तसा विचार मनात आणणं देखील गैर आहे!

तुम्ही राजकीयदृष्ट्या जागे व्हा, त्यागाला तयार व्हा... 'भांडवली-व्यवस्थे'त मोजक्या उच्चमध्यमवर्गीय लोकांना जो मिळतो, त्या तसल्या ऐषोआराम-चंगळवादाची कास सोडून 'गांधीवादा'कडे वळा, 'कार्ल मार्क्स'प्रणित साम्यवादी (कम्युनिस्ट) डाव्या विचारसरणीचा अवलंब करुन 'भांडवलदारवर्ग व वर्गसंघर्ष' निर्माण करणारी 'भांडवली-व्यवस्था'च एकदाची जागतिक व्यवहारातून संपुष्टात आणा... त्यासाठी, तुम्ही एका विचाराने एकत्र या, डाव्या विचारसरणीला एकत्र मतदान करायला लागा आणि मग, बघा 'कंपनी-दहशतवाद' (Corporate-Terrorism) पोसणारा, हा सगळा भयंकर आक्रमक वाटणारा अमेरिकी, इस्रायली, युरोपीय आणि भारतीय भांडवलदारवर्गदेखील, कसा नांगी टाकतो ते! **जसे, गाझापट्टीतले फिदायीन इस्रायलमध्ये घुसल्यावर इस्रायलचे तथाकथित शूर सैनिक (खरंतर, एकदम डरपोक... गाझापट्टीतल्या निशःस्त्र लोकांवर दादागिरी गाजवणारे एकप्रकारचे सरकारी गुंडच ते!) सगळी लाजलज्जा सोडून, हातात अत्याधुनिक शस्त्रं असतानादेखील, जीव घेऊन पळत सुटले होते... तसे, भांडवली-व्यवस्थेचे ठेकेदार, कम्युनिस्ट रेट्यापुढे सपशेल शरण येतील आणि अजेय-अभेद्य वाटणाऱ्या 'भांडवली-साम्राज्या'चे बुरुज सहजी ढासळून पडायला लागतील!**

...दुर्दैवाने, या सगळ्यातून हिटलरचेदेखील सहानुभूतीदार जगात तयार होऊ शकण्याचा मोठा धोका आहे. ज्या हिटलरने जर्मन-ज्यूंवर माणुसकीला काळिमा फासणारे नृशंस अत्याचार केले... तोच हिटलर, आता पुनरुज्जिवीत ('Resurrection') होत, जवळपास आठ दशकांनंतर 'जर्मन-आर्यन' पोषाख बदलून व आता नव्याने इस्रायली गणवेष घालून परत येऊ पहातोय... तो, युगांडाच्या ऐंटेबे विमानतळावरील कमांडो-कारवाईत दगावलेल्या जोनाथन नेत्याऩ्याहू, या एकमेव कमांडोचा धाकटा भाऊ असलेल्या बेंजामिन नेत्यान्याहूच्या रुपात की, अन्य कुणाच्या?...एवढाच प्रश्न शिल्लक रहावा, इतकी वंशविच्छेद करु पहाणारी भीषण-संहारक परिस्थिती गाझापट्टीत सध्या मौजूद आहे!

**नेत्यान्याहूंची 'लिकूड' पार्टी, म्हणजे आपल्याकडची 'बीजेपी'च एकप्रकारे. नेत्यान्याहू हा इसम, भ्रष्टाचाराच्या आरोपातून स्वतःची मान, इस्रायली सर्वोच्च न्यायालयाच्या जोखडातून सोडवून घेण्यासाठी, न्यायालयावरच नियंत्रण प्रस्थापित करण्याचा कायदा जबरदस्तीने करताना, त्याविरोधात आंदोलन करणाऱ्या आपल्याच देशातल्या आंदोलक-नागरिकांना, कित्येक महिने रस्त्यावर उन्हातान्हात उतरायला भाग पाडतो (आपल्याकडे भाजपाई राजवटीत वेगळं काय घडलं किंवा घडतंय?)... तो असला कथित भ्रष्टाचारी, गुन्हेगार इस्रायली-पंतप्रधान, आपल्याच नागरिकांप्रति एवढा संवेदनशून्य असेल; तर, मुस्लिम-पॅलेस्टाईनींविषयी किती क्रूर असू शकेल? आता तर, हमासच्या हल्ल्याचं आयतंच निमित्त हाती लागल्यावर, त्यांच्यातला सैतान अजून खवळून उठून प्रलयंकारी तांडव माजवता झाला नाही, तरच नवल!**

अवघ्या गाझापट्टीतल्या लाखो लोकांना अन्नपाणी, औषध-उपचारावाचून तडफडत मरायला लावण्याच्या इस्रायली क्रूर निर्धारानंतर, "If, Palestinians are 'human animals', then Israelis will prove themselves to be 'inhuman predators" हे, माणुसकी अंतरी जपणाऱ्या जगातल्या प्रत्येकाने, इस्रायली सरकारला ठणकावून सांगण्याची, हीच ती वेळ आहे.

**कुणाला त्यांचा देव जणू एखादा इस्टेट-एजंट असल्यासारखा 'वचनबद्ध जमीन' ('Promised Land') स्वप्नात देऊन जातो... तर, कुणाचे प्रेषित, कुणाचे देवदूत कुठे दफन केले जातात किंवा वावरतात वा अखेरचं रात्रीचं भोजन कुठे घेतात... अथवा, कुणाचे देव कुठे जन्माला येतात; म्हणून, त्या त्या विवक्षित भूमि, त्या त्या धर्मियांसाठी एवढ्या टोकाच्या अतिरेकी 'परमपवित्र' बनून जातात की, ज्या माणसांच्यासाठी त्या 'पवित्र' बनलेल्या असतात, त्यांच्याच रक्ताचा अभिषेक पवित्र-भूमिवरचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी पिढ्यानपिढ्या चढवत जात रहावा? धर्म, माणसांसाठी की, माणसं, धर्मासाठी??**

...हे असंच चालणार असेल, तर आता या यच्चयावत धर्मांना, त्यांच्या देवादिकांसह एकतर रजा देऊन, मेझॉनवाल्या जेफ बेझोसच्या अंतराळयानातून कायमचं दूर भटकंतीला पाठवायला हवं किंवा त्यांना घरात-प्रार्थनास्थळातच मर्यादित केलं गेलं जायला हवं... निदान, सजीवसृष्टीसह मानवी-अस्तित्व धोक्यात आणलेल्या जागतिक-तापमानवाढीच्या महासंकटाच्या भीषण पार्श्वभूमीवर तरी, ''निसर्ग ही 'जात' आणि पर्यावरण हाच, अखिल मानवजातीचा 'धर्म' बनला पाहीजे!''

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

- BSE आणि NSE गुजरातमध्ये जाण्याची शक्यता आहे.
- आधी महाराष्ट्रात येऊ घातलेला फॉक्सकॉन प्रोजेक्ट गुजरातमधील निवडणुकीच्या आधी गुजरातला नेला आणि नंतर तो तिथेही होण्याची शक्यता नष्ट झाली.
- ड्रग्स पार्क, टाटा एअरबस प्रोजेक्ट्स महाराष्ट्रात येणार होते .... गुजरातला वळवले.
- बंदरे, हिरे व्यापार सारखे मोठे प्रोजेक्ट्स ज्यातून मोठ्या प्रमाणावर लहान व्यवसाय, रोजगार व नोकऱ्या निर्माण होऊ शकतात... सगळं गुजरातला. (नको असलेले फक्त इथे लादायचे)
- मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रोजेक्ट जी महाराष्ट्रात १५० किमी आणि गुजरातमध्ये ३५० किमी असणार, त्याचा खर्च मात्र गुजरात आणि महाराष्ट्र समसमान करणार. या प्रोजेक्टचा फायदा महाराष्ट्राला जास्त होणार की गुजरातला ?
- महाराष्ट्राच्या वाट्याचं पाणी गुजरातकडे फिरवण्याचा डाव.
- महाराष्ट्रात मुंबईत दुकानावर मराठी पाट्या नको अशी मागणी. कित्येक उपनगरांमध्ये दुकाने, इमारतींमध्ये 'मराठी भाषे'ला स्थानसुद्धा नाही...

हे झालं महाराष्ट्रापुरतं.
पण महाराष्ट्राला हे चालतं.
फार समजूतदार, उदार मनाची, आदरातिथ्य करणारी, सेवाभावी लोकं राहतात महाराष्ट्रात.
या अनुभवानंतर देशावरही गुजरात लादू पाहतायत.

- मायक्रॉन चिप प्रोजेक्ट, ज्याची पूर्ण मालकी असणार मायक्रॉनकडे आणि मोठी गुंतवणूक संघराज्य सरकार करणार... जाणार गुजरातमध्ये.
- खेळामधल्या यशात वाटा कमी गुजरातचा; पण, खेळाच्या बजेटमध्ये मोठा वाटा सुद्धा गुजरातचा.
- संघराज्य सरकार जगातला मोठा पुतळा उभारणार... गुजरातमध्ये.
- परदेशी पाहुणे, क्षि जिनपिंग, इतर पाहुण्यांना घेऊन जाणार गुजरातमध्ये.

म्हणजे देशाने गुजरातला फक्त, देत राहायचं.
बदल्यात गुजरातकडून देशाला काय मिळणार?

- सैन्यात सर्वात कमी वाटा?
- शिक्षण आरोग्य क्षेत्रात सुमार कामगिरी करत देशाची सरासरी कमी करणे?
- बँकांना फसवून, घपले करून देश सोडून पळून जाणारे मेहुलभाय, निरवभाय सारख्यांचा सर्वात मोठा हिस्सा?
- विलफुल डिफॉल्टर्समध्ये मोठ्ठाली कर्ज असणारे सर्वाधिक गुजराती?
- बँकांना हजारो कोटींचा चुना लावणारे?
- हजारो कोटींचा जीएसटी घोटाळा करणारे?
- सरकारी स्किमा खिशात टाकणारे निवडक मित्र?
- PMO कार्यालयात काम करतो अशी बतावणी करत लष्कराचा पाहुणा बनणाऱ्या किरण पटेल सारखे आणि चांद्रयानचं डिझाईन आपलंच असल्याची बतावणी करणारे ठग?
- आणि देशाला बेरोजगारी, ढासळणारी अर्थव्यवस्था, द्वेषाच्या खड्ड्यात ढकलणारेसुद्धा...

पण, आपली श्रद्धा नेत्यांच्या चरणी सोपवणारी 'प्रजा' या सगळ्याचा विचार करते?
त्यासाठी 'नागरिक' बनावे लागते.

**...सुरज सामंत, ठाणे**



बुलेट ट्रेन प्रकल्पातील, शासकीय जमिनीवरील स्थानिक शेतकरी भूमिपुत्रांच्या घरांना, योग्य मोबदला मिळावा, याकरिता राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी, प्रकल्पबाधित घरमालकांच्या वतीने, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील, शासकीय विश्रामगृहाबाहेर, कोर्टनाका येथे, दि. ०३ ऑक्टोबर–२०२३ रोजीपासून, बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनाला 'धर्मराज्य पक्षा'ने आपला पाठिंबा दर्शविला असून, पक्षाध्यक्ष मा. राजन राजे हे, दि. ०७ ऑक्टोबर–२०२३ रोजी, स्थानिक भूमिपुत्रांच्या आंदोलनात सहभागी झाले होते. दरम्यान, बुलेट ट्रेन प्रकल्पात ज्याप्रमाणे, खासगी जमिनीवरील बाधित घरांना, मोबदला देण्यात आला, त्याप्रमाणे शासकीय जमिनीवरील घरांनादेखील, भुमिसंपादन अधिनियम–२०१३, कलम–१६ अन्वये, "ENTITLEMENT MATRIX'च्या आधारे, मोबदला देण्यात यावा, अशी मागणी शिळ, डावले, पडले, आगासन, बेतवडे, लहानी देसाई, मोठी देसाई, म्हातार्डे, अंजूर–दिवे, देसले या गावातील आंदोलनकर्त्या भूमिपुत्रांकडून, राज्य शासनाकडे करण्यात आली आहे. हे आंदोलन लोकशाही आणि सनदशीरमार्गाने सुरु असून, स्थानिक भूमिपुत्र शेतकऱ्यांवर, अन्याय करण्यात येऊ नये... निव्वळ धनदांडग्या भांडवलदारीवर्गासाठी असणारी बुलेट ट्रेन, महाराष्ट्रातील स्थानिकांच्या मुळावर येणारी तर आहेच; मात्र, त्याचबरोबर यातून फक्त गुजरात राज्याच्या विकास होणार आहे आणि त्याला महाराष्ट्रातील सत्ताधारी हातभार लावत असल्याची घणाघाती टीका, यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना केली.

## अधूनमधून...

अधूनमधून एखाद्या अँटी–एस्टॅब्लिशमेंट चित्रपटाला, सेन्सॉरची कात्री न लावून, अधूनमधून एखाद्या बंडखोर कवीच्या काव्यसंग्रहाला, केडेमी वार्ड देऊन, अधूनमधून जेलमध्ये डांबलेल्या कार्यकर्त्याला जामीन मंजूर करुन, अधूनमधून एखादे बिल मागे घेऊन, अधूनमधून छोट्या–मोठ्या मोर्च्यांच्या मागण्या ताबडतोब मंजूर करुन...

एस्टॅब्लिशमेंट, आपल्या राज्य करण्याच्या मँडेटचे व्हॅलिडेशन करत असते... वाफेची शिट्टी काढत असते !!!

**....संजीव चांदोरकर**



*देशभरातील लोकशाहीविरोधी दडपशाही वातावरणाचं प्रतिबिंब ठाण्यातील राजकारणात प्रकर्षाने दिसू लागल्याने, त्याचा तीव्र निषेध करण्यासाठी, ठाण्यातील महाविकास–आघाडीच्या व त्याला समर्थन देणाऱ्या 'धर्मराज्य पक्ष' व संभाजी–ब्रिगेडमधील नेत्यांची 'इंडिया–आघाडी'च्या बिरुदाखाली टीपटॉप प्लाझा येथे पत्रकार परिषद पार पडली. यावेळी मा. राजन राजे यांनी आपली परखड मते मांडली.*

# ते २.१९ लाख कोटी नेमके कुठे गेले?

*केंद्र सरकारने अज्ञात कोशांत निधी वळवला; कॅगचे कडक ताशेरे : विदेशी कर्जाचा आकडा कमी दाखविल्याचाही ठपका*

**लोकमत न्यूज नेटवर्क :**

**नवी दिल्ली : केंद्र सरकारने सरकारी निधी अज्ञात कोशांकडे (रिपॉजिटरी) वळविल्याचा गंभीर ठपका भारताचे नियंत्रक व महालेखापालांनी (कॅग) जारी केलेल्या ताज्या अहवालात ठेवला आहे. विदेशी कर्जाचे आकडेही सरकारकडून कमी दाखविण्यात आले, असे ताशेरे अहवालात ओढण्यात आले आहेत.**

**वित्त वर्ष २०२१-२२ मधील सरकारच्या हिशेबांचा लेखा परीक्षण अहवाल कॅगने जारी केला आहे. त्यातील २१ व्या अहवालातील 'क्वॉलिटी ऑफ अकाउंट्स अँड फायनान्शिअल रिपोर्टिंग प्रॅक्टिसेस, रिलेटेड टू सेंट्रल गव्हर्नमेंट अकाउंट्स' या नावाने प्रसिद्ध झालेल्या अहवालात सरकारच्या हिशेबातील अनेक त्रुटींवर बोट ठेवण्यात आले आहे.**

कॅगच्या अहवालात म्हटले आहे की, केंद्र सरकारने देशावरील विदेशी कर्जाचा आकडा २.१९ लाख कोटी रुपयांनी कमी दाखविला आहे. डॉलर-रुपयातील जुना विनिमय दर वापरून विदेशी कर्ज ४.३९ लाख कोटी रुपये असल्याचे दाखविले. वास्तविक नव्या विनिमय दरानुसार ते ६.५८ लाख कोटी रुपये असायला हवे होते.

अल्प बचत आणि प्रॉव्हिडंट फंडाची देणेदारी कमी करून २१,५६० कोटी रुपये दाखविण्यात आली आहे. तसेच सरकारी कंपन्यांत किती पैसा गुंतविण्यात आला, तसेच त्यांच्याकडून किती लाभांश सरकारला मिळाला, याचा खुलासाही करण्यात आलेला नाही.

## हा पैसा गेला कुठे?

कॅगच्या अहवालानुसार, राष्ट्रीय अल्पबचत फंडाद्वारे (एनएसएसएफ) सरकारी रोख्यांत केलेली गुंतवणूक तसेच एनएसएसएफ तूट, पोस्ट ऑफिस विमा फंड आणि सरकारी उपक्रम यांतील गुंतवणूक ६,२३,००६ कोटी रुपये आहे. सरकारच्या समरी स्टेटमेंटमध्ये मात्र हा आकडा ६,०१,४४५ कोटी रुपयेच दाखविण्यात आला आहे. यात २१,५६० कोटी रुपये कमी दाखविले आहेत. हा पैसा गेला कुठे, असा सवाल कॅगने उपस्थित केला आहे.

## सरकारी हिशेबातील आणखी काही त्रुटी अशा

- सरकारी उपक्रमांचा निधी 'कन्सॉलिडेटेड फंड ऑफ इंडिया' सह ३ निधी कोशातच ठेवला जावा, असा नियम असताना अंतराळ विभागाने १५४.९४ कोटी रुपये १६ बँक खात्यांत ठेवले. कॅगच्या ताशेऱ्यानंतर ही खाती बंद करण्यात येतील, असे सरकारने सांगितले. मात्र ती बंद करण्यात आली नाहीत.
- दूरसंचार विभागाने यूएसओएफ कराद्वारे १०,३७६ कोटी रुपये वसूल केले. मात्र, त्यातील ८,३०० कोटी रुपयेच कोशात जमा करण्यात आले. उरलेल्या पैशांबाबत सरकारकडून काहीही उत्तर आलेले नाही.
- शिक्षण उपकरापोटी ५२,७३२ कोटी रुपये वसूल करण्यात आले. प्रारंभिक शिक्षण कोशात त्यातील ३१,७८८ कोटी रुपये जमा करण्यात आले. उरलेली रक्कम ज्या कोशांत जमा व्हायला हवी होती, ते कोश मार्च २०२२ पासून कार्यरतच नाहीत. त्यामुळे हा पैसा कुठे गेला, असा प्रश्न आहे.
- कॅगच्या अहवालात न जुळणाऱ्या निधींची अशी १५ प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत.

---

**(प्रख्यात मराठी लेखक-विचारवंत व समीक्षक 'सुनिलजी कर्णिक' संचालित 'मराठी माती' व्हॉटसप-ग्रुपवर, मराठी कामगार, मराठी माणूस आणि त्याची एकूण वृत्ती... या संदर्भाने झडलेला संवाद, मुद्दाम इथे देतोय... तो यासाठीच कारण, सर्वसाधारणपणे कामगार म्हटला की, तो आगाऊ-उद्धट असणारच, दारुचं व्यसन जडलेला, काम टाळण्याच्या वृत्तीचा व दादागिरी करणारा वगैरे, अशी एक पूर्ण नकारात्मक ठाम भूमिका, कामगारवर्गाबाबत उच्चमध्यमवर्गीयांची ठाशीव स्वरुपात कायम असतेच... त्यात, अज्ञानापोटी डाव्या चळवळीविषयी आत्यंतिक घृणा बाळगणाराही, हाच तो वर्ग... हे कामगारवर्गाच्या डाव्या-चळवळीविषयीचे सगळे गैरसमज काहीप्रमाणात तरी दूर व्हावेत, म्हणून हा माझा यत्न आहे! )**

अपर्णा बाईसाहेब, या विचारवंत उद्योजिका लिहीतात ऑफिसमध्ये चार बिहारी ऑफिसबॉय आहेत. राहणं जेवणं सगळं ऑफिसमध्येच, ऑफिसच्या खर्चाने. वर्षातून एक महिना भरपगारी सुट्टी. शिवाय प्रॅाडक्शन एडिट वगैरे फुकट शिकता येतं. असे दोघे तयार होऊन पुढे गेलेही आहेत. सध्या एक दहावीचा अभ्यास करतोय.

एक मराठी मुलगाही होता. खोटं बोलून, दांड्या मारून, पैसे उकळून, दारू पिऊन फुकट गेला.

म्हणजे, एक मराठी मुलगाही ठेवला होता.

**माझा प्रतिसाद : या सगळ्या पांढरपेशांना असे 'अस्तित्ववादी गुलाम'च, त्यांचे व्यक्तिशः किंवा त्यांच्या कॉर्पोरेटीय-विश्वाचे हितसंबंध राखण्यासाठी हवेत... हे खरे माणुसकीचे वैरी तर आहेतच; पण, शिवाय गुलामगिरीतून गुरेढोरासारखं मरमर मरत वर येणाऱ्यांचं, हे जाणिवपूर्वक जाहीर कौतुक करत रहाणारं... जेणेकरुन, असे बिनतोड, बिनबोभाट, बिनदिक्कत, बिनतक्रार काम करत रहाणाऱ्या 'दोन पायांच्या प्राण्यां'ची (मनुष्यप्राणी) संख्या वाढती उपलब्ध रहावी, त्यातून अर्थव्यवस्था वाढती रहावी आणि या पांढरपेशांची, अमानुष आर्थिक-विषमता निर्माण करणारी व निसर्ग-पर्यावरणाचा विध्वंस करणारी, चंगळवादी-जीवनशैली देखील दिवसेंदिवस वर्धिष्णू होत रहावी!**

...पण, हे असे माणूस आणि निसर्गाचं अनन्वित शोषण करणारे, अंति केवळ कुठल्या न् कुठल्या क्रांतिलाच चालना देतात, असं नव्हे; तर, सध्याच्या 'भांडवली-व्यवस्थे'त निसर्ग-पर्यावरणीय महासंकटांना चालना देत... आपल्या महापातकांच्या घड्यांतून पुढील पिढ्यांचं व अवघ्या सजीवसृष्टीचंच 'अस्तित्व' धोक्यात आणतात; कारण, त्यांना नोकरदार-श्रमिक निव्वळ 'अस्तित्ववादी' हवा असतो... त्याचीच, कटू फळं, बूमरँगसारखी त्यांच्याचकडे परत येतात!

अपर्णाबाई : तुम्ही हे आरोप माझ्यावर कसे करू शकता? चार कामगारांची राहण्याजेवण्याची भरपगारी सोय मी करत असेन आणि त्यांना इच्छा असल्यास तंत्रशिक्षणाची सुविधा फुकट देत असेन, तर त्यात अस्तित्ववादी गुलामगिरी कशी? ही जर पिळवणुक असेल, तर माझ्याकडे दहा वर्षांपासून काम करणारे मूर्ख तरी म्हणायचे किंवा बाहेरची स्थिती किती भयानक आहे! चला, मी माणुसकीची वैरी.. तुमच्या शिवीने मला फरक पडत नाही. या गुलामांना मी मुक्त करते. माझी कॅफी मला करून घ्यावी लागेल इतकंच. तुम्ही देता रिस्पेक्टेबल काम त्यांना?

तुम्हीच सांगा बरं उपाय काय तो.

त्यावर, ग्रुपमधील 'प्रकाश कार्लेकर'साहेब मध्येच काही प्रतिक्रिया देतात : सालं, चक्रव्यूहात शिरल्यासारखं वाटतंय. आग्रह कोणते दुराग्रह कोणते काही कळेनासे झालेय. अपर्णा मॅडम यांची भूमिका साऊंड वाटते. बाकी सगळा आनंद आहे. पांढरपेशा, मध्यमवर्गीय वगैरे शब्द हल्ली शिवीसारखेच वापरण्याची पद्धत आहे. तरी बरं सगळ्यांना किमान मध्यमवर्गीय तरी व्हायचंच असतं.प्रकाश कार्लेकर

**माझा प्रतिसाद : गुलामगिरीतसुद्धा गुलामांच्या खाण्यापिण्याचीच काय, आजारपणाचीही काळजी घेतली जायची, मालकांकडून... तिचं अवस्था भूदासांबाबतही होती, सरंजामशाहीत!**

**उद्देश एकमात्र, आपलं काम त्यांच्याकडून चांगलं राबवून घेण्याचाच.**

**तेव्हाही गुलामांच्या मालका-मालकांमध्ये किंवा भूदासांच्या सरंजामदारांमध्ये गुणात्मक फरक होतेच... त्यात, काही वृत्तीने बरेदेखील होते. पण, त्यातल्या कुणीच, ना ती गुलामगिरी-सरंजामशाही नष्ट होण्यासाठी प्रयत्न केले... ना तसे प्रयत्न शक्य तेवढे, यशस्वी होऊ दिले...**

तेव्हाही, 'त्यांना आम्ही पोसतो', हीच भूमिका होती. अहो, सगळेच प्रस्थापित राजकीय पक्षवाले (यात, महाराष्ट्रातले सगळे राजकीय पक्ष आले) पूर्वापार कायमच तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्यांना म्हणत आलेत की, तुला पोटाला लावला ना? मग, चूप बस्, पगारवाढ कसली मागतोस?? कंपनी बंद झाली तर, उपाशी मरशील किंवा 'कारखाना जगला तरच, कामगार जगेल', असे कामगार-कर्मचारीवर्गाला भेदरुन टाकणारे 'हाकारे' दिले जायचे!... कामगार-चळवळ या अशा, पांढरपेशी वाक्ताडनातून थोडी थोडी मरत, आज पूर्णतया नामशेष झालीय... **मात्र, ज्याला मी 'पांढरपेशा' असं खास म्हणतो, तो निव्वळ 'मध्यमवर्ग' नव्हे; तो असतो हकनाक, श्रमिक-कामगारांविषयी, सुप्त; पण, धारदार आकस बाळगणारा तथाकथित सुशिक्षितवर्ग, जो रस्त्यावर उतरुन** ...*(पान क्र. १४ वर)*

**व्यवस्थापनांशी संप वगैरेसारखा संघर्ष (जे सगळ्यात आव्हानात्मक व अवघड काम असतं) करताना सगळ्यात मागे असतो किंवा बहुशः तिथे तो पळपुट्या असल्याने नसतोच... पण, चांगले करार-मदार होतायत पाहीले की, त्यातला सगळ्यात जास्त फायदा उपटण्यात, सर्वात पुढे असतो. त्या पांढरपेशावर्गाच्या नाकर्तेपणामुळेच आज तो, कामाच्या ठिकाणी (उदा. आयटी-उद्योग) कितीही अन्याय-अत्याचाराचा कहर झाला; तरी युनियन-बांधणी करण्याचा त्याला कायदेशीर पूर्ण अधिकार असूनही कंपनीत असलेल्या संघटनेचं साधं युनियन-सभासदत्व घ्यायला कचरतो आणि 'कॉर्पोरेटीय-गुलाम' म्हणून वावरतो!**

**'कंत्राटी-कामगार पद्धती'मुळे एक गोष्ट घडली की, हा सगळा 'स्मार्ट' असलेला (फायदे उपटण्यात हुषार व त्या उपटण्याला तात्त्विक भूमिका-तात्त्विक मुलामा देऊ शकण्याची कपटी बुद्धीही बाळगणारा) कचखाऊ पांढरपेशावर्ग (त्यात, कॉर्पोरेटीय स्टाफ, इंजिनिअर्स, पत्रकार वगैरे आले) त्या शोषणाच्या चक्रात पुरता भरडला गेलाय... त्याचं कारण, निळ्या-कॉलरवाल्यांवर आलेल्या कंत्राटी-महासंकट काळात त्याने माझं काय जातं, मला काय त्याचं, या बाळगल्या अत्यंत हिणकस, अल्पमतीच्या स्वार्थी भूमिकेनं, आज त्यांचंही अपरिमित शोषण होतंय आणि कंपनी-दहशतवादातून आता त्यांचीही सुटका नाही.**

अपर्णाजी, मला आपल्याला मुळीच दुखावण्याची इच्छा नाही... आपणं वृत्तीनं खूप भल्या असू शकता, असालही... पण, कृपया, ज्या पद्धतीने तुम्ही मांडणी केलीत, त्या पद्धतीच्या विचारसरणीनेच आजवर मराठी कामगार-कर्मचारीवर्गाचा भयंकर शोषण व नुकसान झालंय... सगळेच त्यातून, 'कंत्राटी-कामगार पद्धती'च्या चरकात आणि नरकात सापडून उध्वस्त झालेत... मी समजू शकतो, तुमचा तो बिलकूल उद्देश नसेलच... पण, बाकीच्यांवर त्याचा खूप खोलवर नुकसानकारक परिणाम होत जातो, एवढंच जरा लक्षात घ्या. आपल्या भावना दुखावल्या गेल्या असल्यास क्षमस्व!

समर खडसजी : सगळं विश्लेषण परफेक्ट! फक्त ते मराठी कामगार वर्गाचं म्हणजे कामगार अमराठी असल्यास नुकसान झालेलं नाही?

**माझा प्रतिसाद :** दोन्हींचं झालेलं आहे... पण, कामगार हा विषय, 'सामायिक-सूची'तला (Concurrent-List) असल्याने, सध्या आपण महाराष्ट्रातल्याच मराठी कामगारवर्गाबाबत बोलणं इष्ट ठरेल आणि मी नेहमी म्हणतो त्याप्रमाणे, माणूस आणि पदार्थ, यांनी जागा बदलल्या की, ते उत्पात घडवतात... याचा अर्थ, शेकडो-हजारो मैलावरुन उदरनिर्वाहासाठी येणारे 'अतिथी', स्थानिक-संस्कृतीची (यात, धंदा-नोकऱ्या, व्यवसाय व बाकी सगळ्याच जीवनावश्यक बाबी ढोबळमानाने आल्या) 'पुण्यतिथी' घालताना जगभरात दिसतात; तर, समुद्राच्या तळाशी निसर्गतः गाडला गेलेला 'कार्बन', आपण तिथून उपसून बाहेर काढून जाळला की, जागतिक-तापमानवाढीसारखी पर्यावरणीय महासंकटं उभी रहातात)...

**असाच उत्पात, मराठी जनसामान्यांच्या बाबतीत, परप्रांतीयांच्या बेसुमार सांख्यिक आक्रमणाने व बेमुर्वतखोरपणाने झालेला आहे... आणि, जमात म्हणून एकप्रकारे संघटीतरित्या आक्रमण (भले, वरकरणी हातात ढाल-तलवारी, बंदुका नसल्या तरी, ते आहे आक्रमणच) करणाऱ्यांचा मुकाबला, आपल्या जमातीच्या एकत्रिकरणातूनच करता येतो... एकट्यादुकट्याचं ते काम नव्हेच!**

**म्हणून, मराठी छोट्या-मध्यम व्यावसायिकांची व कामगार-कर्मचारीवर्गाची प्राधान्याने काळजी, महाराष्ट्रात नाही घ्यायची; तर, कुठे यूपी-बिहार, बंगालमध्ये घेणार की, चंद्रावर-मंगळावर जाऊन घेणार? म. गांधींच्या 'हिंदस्वराज'मध्ये व त्यांच्या इतर शिकवणुकीतून हा मुद्दा अधिक स्पष्ट होतो; जेव्हा, ते आपल्या बव्हंशी मूलभूत गरजा आपल्या पंचक्रोशीतून पूर्ण व्हाव्यात, असं सातत्याने म्हणायचे.**

स्थानिकत्वाचा मुद्दा हा, वरकरणी 'संकुचितपणा'चा वाटला तरी... माणसांमधली आर्थिक-विषमता मर्यादित राखण्याच्या व निसर्ग-पर्यावरणाच्या संरक्षण-संवर्धनाच्या दृष्टीकोनातून तो, फार फार महत्त्वाचा आहे, हे निर्विवाद!

अपर्णाजी : चर्चा सुरू होती, ती फक्त मराठी विक्रेत्यांकडूनच वस्तू घ्या, या विधानाबद्दल... ते असो.

जो कामगार या व्यवस्थेचा गैरफायदा घेऊन पळून गेला. त्याच्याबद्दलही बोलला असतात, तर बरं झालं असतं.

असो. वैयक्तिक राग नाहीच.

मीही एका कामगाराची मुलगी आहे. तेव्हा कामगारांचे प्रश्न माहीत आहेत आणि त्याची झळही बसलेली आहे.. आणि त्याच वेळी उद्योजक म्हणून कामगार अडवणूक कशी करतात, त्याचाही अनुभव आहे. खरं तर कामगार नव्हे, युनियनचे लिडर्स. ते एक वेगळेच क्षेत्र आहे.

'समर खडस', या मान्यवर पत्रकार-लेखकाने या संवादात मध्येच काही भूमिका मांडली, ती अशी : ही अत्यंत गांधीवादी भूमिका आहे. कामगार/ युनियन लिडर्स अडवणूक करतात गांधीजींनी अहमदाबादमधील कॉटन टेक्सटाईल वर्कर्स स्ट्राइक याच मुद्द्याखाली मागे घ्यायला नैतिक दडपण आणले होते. पुढे भगत सिंग यांनी लेटर टू कॉंग्रेसमधे ज्याचा उल्लेख केला होता. भूमिका एकदम पक्की गांधीवादी खरी

**माझा प्रतिसाद : याला उत्तर, भांडवली-व्यवस्थेतून घ्यायचं नाही; कारण, ते खऱ्या अर्थाने, भांडवली-व्यवस्थेत कितीही सुधारणा केल्यात (कारण, केलेल्या मानवीय-सुधारणा, या अल्पजिवीच कायम ठरतात, हा जागतिक अनुभव आहे व संधि मिळताच भांडवली-व्यवस्था, त्या एकदा केलेल्या सुधारणा, गिळंकृत करते व पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' वृत्तीने, आपले अन्याय-अत्याचार-शोषणाचे दमनचक्र व अमानुष धंदे पुन्हा जोमात-झोकात सुरु करते) तरी, कधिही मिळूच शकणार नाही... ते उत्तर, भांडवली-व्यवस्था नष्ट करुनच, तिला समाजवादी-साम्यवादी शाश्वत-पर्याय (Sustainable lternative) देऊनच सापडेल.** निर्मम-शोषक 'भांडवली-व्यवस्थे'ला जग, हे 'अंगण' म्हणून, निर्दय भांडवली-खेळ खेळायला अत्यावश्यक असतं (अन्यथा, ती अल्पावधीतच कोसळून पडू शकेल, जी आता पुढील काही दशकात, तशीही कोसळणार आहेच) आणि आपण आपल्या गरजा अनावश्यरित्या फुगवत, ते 'आंदण' म्हणून देऊनही टाकतो... जोपर्यंत, आपण 'भांडवली-व्यवस्था'रुपी विषवृक्षाच्या मूळावरच घाव घालत नाही; तोवर, त्याला पुन्हा पुन्हा नव्याने धुमारे फुटत रहातील व आपण अशीच तुकड्या तुकड्यातच 'एक हत्ती आणि चार आंधळे' या नितीने, आपण वायफळ चर्चा करत राहू... धन्यवाद, अपर्णाजी!

***...राजन राजे***
***(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***




***मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर येथे दि. १६ सप्टेंबर-२०२३ रोजी, सायंकाळी दिवंगत साहित्यिक हरी नरके यांची शोकसभा पार पडली. यावेळी धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उपस्थित राहून, आपल्या मनोगतातून त्यांना, श्रद्धांजली अर्पण केली.***

*प्रख्यात निर्भिड व जाज्वल्य पत्रकार (अंबानी-अदानीसारख्या भाजपाई भांडवलदारांकडे आपला मेंदू गहाण न ठेवलेले स्वतंत्र-स्वाभिमानी पत्रकार) पुण्यप्रसून बाजपेयींचा, ''अटलबिहारी बाजपेयींची नसलेल्या आणि नरेंद्र दामोदरदास मोदींची असलेल्या''... 'बीजेपी' सरकारची, पंतप्रधान-कार्यालयाच्या 'नवी दिल्ली'पासून ते नितीन गडकरी-देवेंद्र फडणवीसांच्या 'नागपुर'च्या गल्लीपर्यंतचा, देशाचे ९ लाख कोटी रुपये पाण्यात बुडवल्याच्या, 'रामकहाणी'चा हा व्हिडीओ पहाच!*

*...मग, तुम्हाला एकदम आठवतील ते माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांचे उद्गार, "Narendra Modi would be a 'DIS-STER' as Prime Minister" आणि हटकून आठवेल 'आकार पटेल' (ज्यांचा, सीबीआयसारख्या सरकारी-यंत्रणांनी अतोनात छळ केला) यांनी लिहीलेलं पुस्तक, "PRICE OF THE MODI YEARS"...!!!*

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# ''नोवाक, जगण्याच्या संघर्षात हार मानून दूर दूर पळू पहाणाऱ्या, आमच्या पराभूत-मानसिकतेच्या मराठी कामगार-कर्मचारीवर्गाला... तुझ्या, अमोघ 'विजिगिषू-वृत्ती'चं बाळकडू एकदाचं पाज, रे बाबा!''

*वर्ष-२०२४ च्या पूर्वसंध्येला २४वं विश्वविक्रमी ग्रँडस्लॅम विजेतेपद पटकावणाऱ्या व या विजेतेपदासोबतच इथून पुढे, निःसंशयरित्या 'ऑल टाईम ग्रेट' (GOT) ठरलेल्या नोवाक जोकोविकचं हार्दिक अभिनंदन!*

मुळातून, दोन वर्षांहून अधिककाळ सर्बियन यादवी-युद्धात होरपळून निघालेल्या कुटुंबाला टेनिससारख्या महागड्या खेळाचं प्रशिक्षण लहानग्या नोवाकला देणं बिलकूल परवडणारं नसतानाही, केवळ अचाट जिद्द व दुर्दम्य आत्मविश्वासाच्या बळावर नोवाक टेनिस खेळाचं कसंबसं प्रशिक्षण घेत गेला. पण, पुढे व्यावसायिक टेनिसपटू म्हणून सततचं अपयश आणि सोबतीला दुखापतींचा ससेमिरा... यामुळे, वर्ष-२०१०मध्ये नोवाक जोकोविकच्या कारकीर्दीचं आभाळ अगदी काळ्याकुट्ट ढगांनी व्याप्त झालं होतं...

**आपण यापुढे स्पर्धात्मक टेनिस खेळण्यास पात्र नसल्याचा निष्कर्ष मनोमन काढून 'टेनिस रॅकेट'ची तलवार म्यान करुन परतीच्या प्रवासाचे वेध लागलेल्या गड्याला घरच्यांच्या अतीव प्रेमळ आग्रहाच्या 'ढाली'ने टेनिस रॅकेटची तलवार परजवत, परत टेनिसकोर्टावर परतवलं... 'रुसलेली प्रतिभा' नेमकी त्याचवेळेस नोवाकवर कधि 'फिदा' झाली, त्याचं त्यालाच कळलं नाही. त्यानं आहार बदलला, आहारतज्ज्ञांच्या सांगण्यानुसार 'ग्लुटेनमुक्त' आहार सुरु केला (तो स्वतःच एक खवैय्या आणि आहारतज्ज्ञसुद्धा असून, मोनॅको या दुसऱ्या क्रमांकाच्या छोट्या देशात त्याचं स्वतःच 'एक्टिटा' नावाचं शाकाहारी 'फूड जॉईंट' आहे)... आणि मग, एकापाठोपाठ एक टेनिस-विश्वात, विक्रमी चमत्कारांची मालिकाच उभी रहायला लागली... नियती किती लहरी, किती चमत्कारिक असते बघा!**

''परतीचे दोर कापायला प्रत्येक वेळी शेलारमामाची तलवारच लागते, असं नव्हे; निरतिशय प्रेमाची नाजूकसाजूक 'धार'सुद्धा'', त्याकामी पुरेसा प्रभाव राखून असू शकते.

तलवारीसारखी रॅकेट फिरवणारा 'नोवाक' आता, निष्णात कोळ्याच्या कौशल्याने 'होडीच्या वल्ह्या'सारखी, समोरचा प्रतिस्पर्धी कोण कसा आहे, हे पारखून... प्रतिस्पर्ध्याच्या प्रतिरोध करणाऱ्या 'वाऱ्या'च्या दिशेचा अचूक अंदाज घेत, आपली नौका विजयाच्या दिशेनं नजाकतीने वल्हवू लागला. हे कौशल्य एव्हाना, वल्ह्यापलिकडे जात, शिडापर्यंत खोलवर पोहोचलं होतं... **''एखाद्या कोळियाने वाऱ्याच्या वेग शिडात भरुन घ्यावा'', तसं, त्या शीड उभारणाऱ्या कोळियाचं कसब नोवाकच्या टेनिस-रॅकेटमध्ये ओतप्रोत भरलेलं दिसू लागलं. हवेत विविध अंशातून गिरकी घेत वळण घेणारी त्याची रॅकेट, प्रतिस्पर्ध्याचा चेंडूवरचा 'स्पिन' निष्प्रभ ठरवत, उलट त्यावर नक्षीकाम केल्यासारखा, स्वतःच्या ताकद व कौशल्याने अधिकच्या वेगळ्याच 'स्पिन'ची भर घालत चेंडू परतवू लागली... हे वारंवार, प्रतिस्पर्ध्यांसाठी न पेलणारं आव्हान ठरु लागलं. उंदराला मांजर खेळवतं, तसं प्रत्येक प्रतिस्पर्ध्याच्या खेळाचा एकूण आवाका ध्यानात घेत, त्यांना तो खेळवताना दिसू लागला.**

'ड्रॉ'मध्ये आपल्या समोर फेडरर, नदाल एकवेळ परवडले; पण, आपल्या खेळात सदैव कमालीचं सातत्य राखून असणारा नोवाक नको, असं प्रत्येक खेळाडू देवापुढे धावा करु लागला. त्या सातत्यपूर्णतेतली चमत्कारिकता एवढी मोठी की, अनेक दिग्गज टेनिसपटू म्हणू लागले की, ''नोवाकने, ध्रुवप्रदेशातल्या अस्वल वगैरे प्राण्यांसारखी दीर्घकालीन शीतनिद्रा (Hybernation) घेतली आणि त्या प्रदीर्घ निद्रेतून त्याला उठवून त्याच्या हातात रॅकेट दिली; तरी, तो आमचा हमखास पाडाव करेल''...म्हणूनच, देव पाण्यात बुडवून बसलेल्या कुठल्याही टेनिस-स्पर्धकाच्या दुर्दैवाने जर, नोवाक त्याच्या वाट्याला आला की, पालीसमोर नांगी टाकणाऱ्या विंचवासारखी शब्दशः अर्धमेली-गलितगात्र अवस्था, भल्याभल्या दिग्गज टेनिसपटूंची व्हायला लागली... मग, नोवाक, उरलेलं अर्धमुर्धं काम, बिनबोभाट टेनिसकोर्टावर पुरं करु लागला आणि एकापाठोपाठ एक टेनिस-चषकांचा आणि घसघशीत पारितोषिकांचा रतीब नित्यनेमाने घालू लागला.

काळ्या खुरट्या केसांमधून हलकेच डोकावू पहाणारी पांढरी सुतारफेणी, नोवाकच्या वाढत्या वयाचा संदेश देत असतानाच, अवघ्या २० वर्षांच्या तारुण्यानं मुसमुसलेल्या नव्या दमाच्या अल्काराझ कार्लोससशी झुंज घेणं म्हणजे, ''उधाणाच्या लाटेला अंगावर तर घ्यायचं; पण, पायाखालची वाळू जराही सरकू द्यायची नाही'', असं अवघड शल्यकर्म पार पाडणं!

त्यात, विम्बल्डनमध्ये शर्थीच्या झुंजीत अपयश पदरात पडलं; तरी, सिनसिनाटी-मास्टर्समध्ये बेफाम उफाळणाऱ्या कार्लोसला पराभूत करुन त्यानं सनसनाटी तर पैदा केलीच... पण, ''टायगर, अभी जिंदा है''चा इशारा, कार्लोससह सर्व प्रतिस्पर्ध्यांना दिला!

**यंदाच्या यूएस-ओपनच्या तिसऱ्या फेरीत लॉस्लो जेरे विरुद्ध पहिले दोन सेट्स नोवाक हरलेला पाहून, हरखून गेलेला कार्लोस, नोवाकचा 'कम बॅक' दुसऱ्या दिवशी सकाळी समजल्यावर उत्स्फूर्तपणे म्हणाला, ''जरी मी नोवाक पहिले दोन सेट हरल्यावर शांतपणे झोपायला गेलो; तरी, माझं अंतर्मन मला सांगत होतं की, हा प्राणी दोन सेटच्या पिछाडीनंतरही मुसंडी मारणार आणि त्याने तो चमत्कार पुन्हा घडवलाच... आश्चर्य आहे की, वयाच्या ३६व्या वर्षी, तो असा पराक्रम गाजवतोय की, जणू तो ३६चा नसून २६ वर्षाचा नवयुवक आहे!''**

वयाच्या पंचविशीनंतर प्रत्येक वर्षी निसर्गतः माणसाच्या फुफ्फुसाची क्षमता १ टक्क्याने घटत जाते; म्हणजेच, यूएस-ओपनच्या अंतिम फेरीत खेळताना २७ वर्षीय मेदवेदेवच्या तुलनेत, नोवाकची दमछाक (Stamina) ९ टक्के कमी होती, हे कसं विसरुन चालेल? त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणून, १० पेक्षा जास्त परतीचे फटके (रॅलीज) ज्या गेम्समध्ये झाले... ते गेम्स, मेदवेदेव आधिक्याने जिंकला... तरीही, नैसर्गिक-प्रतिकूलतेबाबत अथवा लसीकरणाच्या वादग्रस्त मुद्द्यावर कोविड-काळात गेल्यावर्षी यूएस-ओपन व ऑस्ट्रेलियन ओपन खेळू न शकलेल्या, नोवाकने कुठली कुरबूर न करता मिळवलेला हा दैदीप्यमान विजय होय.

एकदाची ती, तिसऱ्या फेरीतली सत्वपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, मागा वळून पाहील, तर तो नोवाक कसला? ...नंतर, नोवाक नावाच्या 'सुपरनोवा'सारख्या शक्तिशाली महापुराच्या जबरदस्त लोंढ्यापुढे... बायबलमधली 'नोवाची नौका' (Noah's rch) बचावाला न आल्यामुळे, चौथ्या फेरीपासून पुढे, अगदी थेट अंतिम फेरीपर्यंत सगळेच प्रतिस्पर्धी, लाकडी ओंडक्यासारखे सहजी वाहून गेले.

२४ व्या ग्रँडस्लॅम विजेतेपदाची माळ गळ्यात पडताना, अर्थातच नोवाकची नजर किमान पुढील वर्षी 'ग्रँडस्लॅम-विजेतेपदांची 'रजत-जयंति' साजरी करण्याकडे लागली असणार, जेव्हा आमच्या मराठी तरुणाला स्वतःच्या भविष्याचे नव्हे; तर, पुढील वर्षाच्या भंडारा, सार्वजनिक पूजा किंवा गणेशोत्सव, दहीहंडी किंवा गरब्याच्या तारखांचे भिकेचे डोहाळे लागलेले असतात!

सर्बियन (मातृभाषा), इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, चायनीज, जपानी, अरबी, इटालियन, स्पॅनिश, रशियन, पोर्तुगीज अशा एकूण ११ भाषा अवगत असणारा (त्यातील, ५ भाषांवर तर, चांगलंच प्रभुत्व) 'नोवाक' आणि त्याच्या टेनिस-विश्वविक्रमांची लंबीचौडी मालिका पाहून, आपण खचितच 'अवाक' झाल्याखेरीज राहू शकत नाही. आता फारच थोडे टेनिस-विक्रम, त्याच्या नावापुढे लागणं, शिल्लक राहीले असतील...

**नदाल आणि नदालसारखाच बळकट देहयष्टी असणारा नवतरुण (वय वर्ष, अवघं २०) कार्लोस अल्काराझ... अशा दोन खतरनाक स्पॅनिश खेळाडूंच्या दोन पिढ्या, जोकोविकशी झुंजताना पहाणं, ही गोष्ट देवदुर्लभच... पण, यंदाच्या अमेरिकन-ओपनमध्ये अनपेक्षितरित्या डॅनियल मेदवेदेव समोर, उपान्त्य फेरीतच चार सेट्समध्ये कार्लोस पराभूत झाल्याने, स्पॅनिश-सर्बियन अशा दोन टेनिस-महाबैलांची झुंज पहाणं, टेनिस-शौकिनांच्या नशिबी नव्हतं!**

''यंदा चारही ग्रँडस्लॅम स्पर्धांमध्ये अंतिम फेरित धडक मारणं (हा पराक्रम, त्याने एकूण तिनदा केलेला आहे) आणि त्यातल्या तीन जिंकणं... ही काही मोठी आश्चर्याची बाब नव्हे. माझी प्रचंड मेहनत व चिकाटी, हे घडवून आणतेय आणि शरीर अजूनही उत्तम साथ देत असल्याने, मी काही लवकर निवृत्त होणे नाही'', हे 'नोवाक'चे दृढनिर्धारी खडे बोल... आमच्या दहीहंडीत थराथर थर लावणाऱ्या (त्यातही, २०१५ साली स्पेनचाच १० मानवी थर लावणारा संघ, अजूनही विश्वविक्रमी आहे) पण, कॉर्पोरेटीय-विश्वातल्या 'कंपनी-दहशतवादा'समोर थरथरणाऱ्या 'मराठी-तरुणाई'ने जर ऐकून मनावर घेतले आणि त्यांना फाजिल-उत्सवप्रियतेच्या नादी लावणाऱ्या डँबिस राजकीय-नेत्यांपासून फारकत घेत, स्वतःच्या राजकीय-विचारविश्वात प्रयत्नपूर्वक डाव्या विचारांची क्रांति घडवून आणली... तर, कंत्राटी-कामगार पद्धतीतील गुलामगिरी व नव-अस्पृश्यता' नष्ट व्हायला आणि मराठी-भावविश्वात सुरक्षितता-सुखसमाधान यायला, कितीसा वेळ लागेल...???

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***




*मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी, मनोज जरांगे-पाटील यांनी सुरु केलेल्या बेमुदत उपोषणाच्या समर्थनार्थ, 'सकल मराठा समाजा'च्या वतीने, ठाणे शासकीय विश्रामगृहाबाहेर शनिवार, दि. २८ ऑक्टोबर-२०२३ रोजीपासून, लाक्षणिक साखळी उपोषण सुरु करण्यात आले असून, या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उपस्थित राहून, मराठा आरक्षणाला आपला पाठिंबा व्यक्त केला. यावेळी दत्ता चव्हाण, मंगेश आवळे, प्रवीण पिसाळ, संतोष मोरे, महेश कदम, विद्या कदम आदी मराठा समाजातील मुख्य पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे लोकसभा उपाध्यक्ष नरेंद्र पंडित, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, कामगार प्रतिनिधी समीर चव्हाण, युवा कार्यकर्ते नितीन उगले, सिद्धेश सावंत-भोसले आणि नितीन वायदंडे आदी मान्यवर उपस्थित होते.*

*दीर्घकाळ सामाजिक चळवळीत अग्रेसर असणाऱ्या, डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्या आणि कॉ. फिरोज मिठबोरवाला यांच्या सहकारी, श्रीमती निरंजनी शेट्टी यांनी, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची, त्यांच्या ठाणे कार्यालयात बुधवार, दि. ११ ऑक्टोबर-२०२३ रोजी, सदिच्छा भेट घेतली. यावेळी सद्य राजकीय परिस्थिती, कंत्राटीकरण, देशातील वाढता जातीय-धार्मिक उन्माद, डाव्या चळवळीची पुढील वाटचाल, भारतीय जनता पक्षाचं देशावर आलेलं 'राजकीय' संकट व त्यामाध्यमातून धोक्यात आलेली लोकशाही आणि आगामी २०२४च्या सार्वत्रिक निवडणुका, या विषयांवर प्रदीर्घ चर्चा झाली. दरम्यान, 'धर्मराज्य पक्षा'ची नेमकी भूमिका, मा. राजन राजे यांनी, श्रीमती निरंजनी शेट्टी यांच्याशी बोलताना मांडली.*






मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करूया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित

## 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

या कामगार संघटनेत सामील व्हा !!!







राजन राजे
(अध्यक्ष)

महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९११७

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)